# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०२/१२/२००३

आज दि. ०२/१२/२००३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची दि. २०/११/२००३ रोजीची तहकुब मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सुचना क्र. ०८ दि. १२/११/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवरील पुढील विषयांवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझ्झफर हुसेन | उपमहापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्री. परशुराम पाटील | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ९) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्री. मदन उदितनारायण सिंह | सदस्य |
| १९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २०) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २१) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २२) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २३) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २४) | श्रीम. लिला गुरूनाथ पाटील | सदस्या |
| २५) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २६) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| २७) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| २८) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २९) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३०) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३१) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३२) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३३) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ३५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ३७) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३८) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ३९) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंन्सा | सदस्य |
| ४०) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४२) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ४३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ४४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ४५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ४७) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ४८) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ४९) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | सदस्य |
| ५०) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५१) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५२) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ५३) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ५४) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ५५) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ५६) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ५७) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ५८) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५९) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६०) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६१) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ६२) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ६३) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ६४) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ६५) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ६६) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ६७) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| २) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. शानु गोहिल | सदस्या |
| ४) | श्री. हंसुकूमार पाडे | सदस्य |
| ५) | श्री. प्रफुल्ल काशिनाथ पाटील | सदस्य |
| ६) | श्री. आत्माराम बाळाराम गावंड | सदस्य |
| ७) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ९) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| १०) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंन्डोंसा | महापौर |
| २) | श्रीम. सुनिता कैलास पाटील | सदस्या |
| ३) | श्री. चंद्रकांत बी. मोदी | सदस्य |
| ४) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |
| ६) | श्रीम. कैलासबेन दिनेशचंद्र जानी | सदस्या |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**प्र. सचिव :-**

आजच्या सभेबाबत मा. महापौरांनी रजेचा अर्ज दिलेला आहे. आजच्या सभेत हजर राहणार नाही असे लेखी अर्जाने कळविले आहे. त्यामुळे आजच्या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून उपमहापौर काम पाहतील.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, आजची सभा सुरु होण्यापूर्वी आज आपले महापालिकेचे आयुक्त साहेब यांना एक वर्ष पूर्ण झालेले आहे. त्यांनी अतिशय चांगल्या त-हेचा कारभार चालविला. त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि अभिनंदनाचा ठराव मोडतो.

**मोहन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ४० :-**

मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेत एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी आतापर्यंत उत्तम प्रकारे योगदान दिले असून या शहराची चांगली सुधारणा केलेली आहे. त्यांच्या केलेल्या चांगल्या कामाबाबत ही सर्वसाधारण सभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी श्री. आर. डी. शिंदे साहेबांचा एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला आहे आणि या कार्यकाळामध्ये अनेक निर्णय त्यांनी घेतलेले आहेत आणि सर्व सभागृहातील सन्मा. सदस्याच्या भावना, त्यांच्या सुचना यांचा विचार करून विकास कामाला चांगली गती त्यांनी मिळवून दिली. यापूर्वीही आलेल्या आयुक्तांनी या सभागृहाशी इमान-इतबारे काम करून या शहराचा विकास करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली होती. तसेच एक स्मित आणि हास्य आपल्याकडे बघितल्यावर आम्हाला स्वतःला हास्य येते अशा पध्दतीचे एक व्यक्तीमत्व. मला वाटते जगा आणि जगू द्या, अशा पध्दतीचे घोषवाक्याचा कार्यक्रम झालेला आहे. परंतु आज या सभागृहात मला स्वाभिमानाने सांगावेसे वाटते, हसा आणि हसू द्या आणि हसत या शहराचा विकास करु द्या. अशा पध्दतीचे व्यक्तिमत्व आपले आमच्या शहराला लाभले त्याबददल मी माझ्या सभागृहाच्या वतीने आपल्याला धन्यवाद देऊ इच्छितो आणि आपला कार्यकाल याच्यापुढे चांगला होवो आणि या शहराचा विकास चांगल्या पध्दतीने घडो अशा सदिच्छा व्यक्त करतो आणि आपल्याला पुष्पगुच्छ देऊन आपला सत्कार करु इच्छितो.

**मा. आयुक्त :-**

आदरणीय पीठासन अधिकारी, सन्मा. उपमहापौर मुजफ्फर हुसेन साहेब आणि सर्व सन्मा. सदस्य आणि माझे अधिकारी वर्ग, सहकारी बंधु भगिनींनो एक वर्ष पूर्ण होणे ही जरी तशी औपचारिक

बाब असली तरी याचे भान ठेवून या सभागृहाने माझे कौतुक करावे. खरं तर इतकं कौतुक करण्यासारखं माझ्याकडून काही झाले असेल असे मी समजत नाही. जे काही थोडंफार घडलं असेल ते आपल्या सर्वांच्या सहकार्याने घडलेले आहे. आपण सर्व चांगले आहात, सहकार्य करणारे आहात. त्यामुळे काही घडू शकले. बरेचसे काही आपल्याला घडवायचे आहे. आपल्या सहकार्याने यापुढे असेच कार्य होत राहिल, एवढे आपल्याला आश्वासन देऊन आपले मनपूर्वक आभार मानतो. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो , या सभागृहात सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी आयुक्तांचा कार्यकाल एक वर्षाचा झाला म्हणून अभिनंदनाचा ठराव मांडला, अनुमोदन देतेवेळी सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यांचे मत मांडले आणि त्यांनी स्वागतही केले. आम्ही समजतो सर्व सभागृहाच्या वतीनेच त्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. एक सभागृहाची परंपरा आहे की, सभागृहात अस्तित्वात असलेल्या पक्षाच्या कोणीतरी पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याबददल मत व्यक्त करावे म्हणून भारतीय जनता पार्टीच्या वतीने मी आयुक्तांचे स्वागत करतो, अभिनंदन करतो. त्यांनी जो एक वर्षाचा कार्यकाल जो पूर्ण केला त्यात अनेकांना विश्वासात घेण्याचा तो त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे. तो ही कौतुकास्पद आहे. जी ती कामे त्यांनी घ्यायचा प्रयत्न केला त्यांनी तसच सांगितले की फार काही केले असे नाही नसेल जे केलं असेल त्याच्याही मी आमच्या वतीने सांगू इच्छितो की जे केले ते ठोस केले असं भारतीय जनता पार्टीला वाटते आणि जे नाही केले ते करण्यासाठी ठोस पार्टी तुमच्या पाठीमागे उभी राहिल, असेही या सभागृहात आश्वासन देतो आमचा अनुभव आहे, की जे आम्ही ठोस सांगतो ते ही आयुक्त ठोसपणे करतात, याच्याही पुढे करतील ईश्वर चरणी प्रार्थना करतो. पक्षाच्या वतीने करतो, सभागृहाच्या वतीने करतो की, त्यांच्या पुढील कारकीर्दीमध्ये या शहराची खरोखरच भरभराट व्हावी की जेणेकरुन कुठेतरी ते पटलावर यावे तसे मी हसता हसता बोललो नाईक साहेबांना विचारले, पानपटटे साहेबांना विचारले, केळकर साहेबांना विचारले की, आपल्या बक्षिसामध्ये नंबर लागला की नाही. कुठे आपला प्रश्न सोडवायचा बाकी राहिला का? साधारण अपेक्षा होती की, हे जे संत गाडगेबाबा महाराज अभियानाचे बक्षिस मिळावे असे वाटत होतं पण आपल्या महापालिकेला ते बक्षीस मिळाले नाही त्यामुळे थोडी चुरचुर लागली की, आपण कुठे कमी पडलो. कुठे कमी पडलो, तर याला पुढचा मोका येईल की ज्याने महापालिकेच्या कामकाजाची कामानिमित्त जी काही बक्षिसं असतील, मग ती महाराष्ट्र शासनाची असु दे अगर केन्द्र शासनाची असु दे. मिरा भाईंदर महापालिकेचे नाव आपल्या कारकिर्दी मध्ये पहिल्या नंबरवर यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

**रतन पाटील :-**

मा. पीठासन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, मा. आयुक्त साहेब यांच्या कार्यकालाला आज एक वर्ष पूर्ण झालेले आहे. या कार्यकालामध्ये मा. आयुक्तांनी तसेच सर्वांना आमच्या पक्षालासुध्दा वेळोवेळी काही समस्या घेउन गेल्यानंतर त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत मृदू भाषी, कठोर प्रशासक, नेहमी हसतमुख असणारे आमचे आयुक्त, यांचा हा एक वर्षाचा काळ पूर्ण झालेला आहे. पुढील कार्यकालासाठी मी म्हाळसा मातेच्या चरणी प्राथर्ना करतो. त्यांचा पुढील कार्यकाल यशस्वी होवो अशी मी प्रार्थना करतो.

**चंद्रकांत वैती :-**

मा. पीठासन अधिकारी आणि कमिशनर साहेब मा. सभागृह आपल्या महापालिकेत आयुक्तांना एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाला खऱ्या अर्थाने दहा महिन्यांचा कार्यकाल पूर्ण झालेला आहे. दोन महिने आपण ट्रेनिंग साठी बाहेर गेले होते आणि या ट्रेनिंगमधून बऱ्याच नवीन गोष्टी आणलेल्या आहेत. नाविन्यपूर्ण गोष्टी या मिरा भाईंदर शहरामध्ये राबवून पुढील कारकिर्दीत आपल्याला हार्दिक शुभेच्छा.

**प्रकाश दुबोले :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आयुक्त म्हणून आज एक पूर्ण एक वर्षाची कारकिर्द मा. शिंदे साहेबांनी पार केलेली आहे हा कारभार करित असताना सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना, नगरसेवकांना व्यवस्थित मार्गदर्शन करुन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत आणि त्यांच्या सर्व कर्मचारी वर्गांना देखील हाताशी धरुन, त्यांच्या सहकार्याने मिरा भाईंदर महानगरपालिका कारभार त्यांनी व्यवस्थित पार पाडलेला आहे. दोन महिने ट्रेनिंगला गेले असताना देखील या मिरा भाईंदरशी नाते असल्या कारणाने त्यांनी दोन महिन्यात सुध्दा सतत संपर्क ठेवून आम्हा सत्ताधारी पदाधिकाऱ्यांना चांगले मार्गदर्शन केले आणि त्यामुळे कारभार व्यवस्थित शांततेत पार पडलेला आहे असेच पुढील कारकिर्दीत आपण सहकार्य मार्गदर्शन करावे अशी मी आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आपले या ठिकाणी अभिनंदन करतो.

**अशोक पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची नव्याने स्थापना झालेली आहे. पहिल्यांदाच आयुक्त पदाचा मान मिळविणारे मा. आर. डी. शिंदे साहेब हे कुशल प्रशासक म्हणून आहेत अशी त्यांची ख्याती होते. एक वर्षाच्या कारकिर्दित त्यांनी ते दाखवून दिलेले आहे या महानगरपालिकेच्या एक वर्षाचा कारभार त्यांनी अतिशय कुशलतेनी सांभाळलेला आहे या एक वर्षाच्या कारकिर्दीत अडीअडचणीच्या वाटणाऱ्या ज्या काही घटना आल्या त्याला यशस्वीरित्या सामोरे जावून यशस्वी रित्याने हाताळले आहेत. या शहराच्या दृष्टीने महत्वाचे म्हणजे आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आणि घनकचरा निवारण आल्या आल्या त्यांनी या कार्यक्रमाला गती देउन आज त्याला मूर्त स्वरुपाची चालना त्यांनी दिलेली आहे. कुशल प्रशासक म्हणून त्यांची ख्याती आहे. या एक वर्षामध्ये त्यांनी सर्व लोकप्रतिनिधिंना व्यवस्थितपणें हाताळले आहे. सर्वांना व्यवस्थित अशी वागणूक दिलेली आहे आणि त्यांचा पुढील कार्यभार असाच यशस्वीरितीनेच चालावा अशी त्यांना शहर विकास आघाडीतर्फे हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन करतो. आणि आमच्या शहर विकास आघाडीतर्फे त्यांना नेहमी सहकार्य राहिले अशी ग्वाही देऊन मी माझे दोन शब्द संपवितो. जयहिन्द जय महाराष्ट्र.

**रोहित सुवर्णा :-**

आदरणीय महापौर जी आयुक्त श्री आर. डी. शिंदे का पुरा एक साल हुआ। हम लोग भी सभागृह मे नये है। वो भी यहाँ पर नये आये। पुरे महाराष्ट्र मे जैसे अरुण भाटीयाजी है। टी. चंद्रशेखरजी है। सदाशिव तिनईकर साहब थे। मिरा भाईंदर मे दिलीप पायगुडे साहब मुख्याधिकारी बनकर गये। उन सब की कारकीर्दीका देखते हुए मिरा भाईंदरमे बहुत कुछ करना बाकी है। क्योंकी हमारी बजेट कम है तो भी लोगो की आबादी बहुत ज्यादा है। और लोग मुंबई महानगरसे जुडे हुए है। इसलिए सभी की अपेक्षा भी मुंबई के लगभग मुंबई मे जो फॅसलिटी अव्हेलेबल है वो ही सभी नागरिक चाहते है। शिक्षणका क्षेत्र हो, धार्मिक क्षेत्र हो या सामाजिक क्षेत्र हो, या कोई भी सुख सुविधा हो। हर एक की अपेक्षा मुंबई महानगरपालिकाकी जैसे अव्हेलेबल है वो ही सभी चाहते है। शैक्षणिक क्षेत्र हो, धार्मिक क्षेत्र हो, या सामाजिक क्षेत्र हो या कोई भी सुख सुविधा हो। बल्की हम नगर सेवक भी वही चाहत है। यहाँ के शिक्षा के क्षेत्र माध्यम सभी मुंबईसे जुडे हो। जो अपेक्षा सब की थी, वो अपेक्षा पिछले पंधरा सोला-सतरा सालो से नगर परिषद बना अब महानगरपालिका बना। उस एक्सपेक्टेशन तक हम कर नही सके। इसके लिए कही कहानियाँ जैसे की सभी नगरसेवक ज्यादा पढे लिखे नही है। या फिर कोई पहली बार चुनकर आये है। या फिर कोई अधिकारी वर्ग ॲडमिनिस्ट्रेशन मे कही हमारे से कमीयाँ है। प्रशिक्षण ठिक नही है। कही कारण हो सकते है। लेकिन आपसे बडी उम्मीद है क्योंकी आप आयुक्त बनके आये तो नॉमिनेटेड आय.एस. ऑफिसर है। एक प्रशासन आपके हाथ मे है। पुरा चीफ ऑफिसर के पत्र मे और आय.एस. ऑफिसर के पत्र मे बहुत फरक होता है। जब आपका मंत्रालय मे पत्र जाता है तो उसको बहोत गौरसे पढा जाता है। उस पर अंमल भी होता है। तो बहोत सारी प्रोजेक्ट आपके माध्यम से हो। ऐसी मै भी यहाँ पर प्रार्थना करता हूँ। जय हिन्द।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर की परवानगीसे बोलता हूँ। महापौर साहब पिछली महासभामे जब इस सभागृह में चर्चासत्र शुरु था। विषय पत्रिका पर विषय चालू था।

**रिटा शाह :-**

मला वाटले अभिनंदनाचा ठराव मांडतात, म्हणून मी बसून राहिली. तर सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना एक विनंती आहे की मला अभिनंदनाचा ठराव मांडू द्या. नंतर आपण तो विषय सुरु करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पक्ष के हिसाब से सभागृह मे अगर धन्यवाद प्रस्ताव करेंगे। तो वो प्रथा अच्छी नही रहेगी। नही तो यहाँ पे पच्च्यासी नगरसेवक है।

**रिटा शाह :-**

साहब पक्ष की बात छोडो। एक महिला नगरसेविका के हिसाब से मैने उनको रिक्वेस्ट किया है। अगर मेरी रिक्वेस्ट मानो तो ठिक है। ऐसा नही की मैने उनको इन्टरप्ट किया है। मा. महापौर साहब मिरा भाईंदर महानगरपालिका और नगरपालिका पिछले ग्यारह सालसे ऐसे तो पंधरा सालसे इस फिल्ड मे हुँ। इस मिरा भाईदर क्षेत्र का नाम बहुत अच्छे कामो में भी गाजा और बहुत बुरे कामों मे भी गाजा। मिरा भाईंदर हमेशा गाजावाजा मे ही रहा। क्योंकी चीफ ऑफीसर हमारे इधर आये और गए।

लेकिन पिछले टाईम चीफ ऑफिसर शिवमुर्ती नाईक साहब की कुछ बात कर ने को आयी तो मैने उनका भी अभिनंदन किया था क्योंकी उन्होने भी काफी अच्छा काम किया था। लेकिन आज आपने इस मिरा भाईंदर क्षेत्र के अंदर आयुक्त पद के उपर एक साल पूर्ण किया है। और साथ ही जैसे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती ने बताया वैसे आपने दो महिने की ट्रेनिंग भी ली। लेकिन वो ट्रेनिंग के दरम्यान भी आपने मिरा भाईंदर क्षेत्र के लिए वहाँ काम सिखा है और वहॉ जो आपने सिखा है। आपका एक वर्ड मुझे याद है की, वहॉ मै बैठता था तो मुझे ऐसे लगता था की कितने बडे बडे स्किम ये वो वगैरे, लेकीन प्रॅक्टीकली जहॉ आते है, तो वहॉ वो चीज उपलब्ध नहीं होती है। तो मुझे ऐसा लगता है की आप डॅशिंग है। और आपके पास हर चीजो की नॉलेज है। उन प्रोजेक्ट को आप हमारे शहर के लिए उपलब्ध करा के देंगे। और दुसरी एक मै आपको अभिनंदन की बात करती हूँ की, कितना भी वाद और राजकारण होता है। लेकिन आपके अंदर ऐसी शक्ती है की, जैसे इस्टका जैसल पार्क का कोई इश्यु था। उसको आपने ना पॉलिटिकली होने दिया ना आपने उसको कोई रंग आने दिया जो समस्या आपने उस मुद्दे को हटाया उसी तरह आप हमेशा हमे को ऑपरेट करते रहेंगे। मार्गदर्शन देंगे, ऐसी आशा व्यक्त करता हूँ। और आनेवाले सालो मे आप अच्छे से अच्छे प्रोजेक्ट हमारे शहर के लाके आप हमारा और आपका दोनो की वाहवा करवायेंगे। इस तरह मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र के इस हाउस के अंदर सभी महिला नगरसेविका की तरफ से आपका हार्दिक अभिनंदन करती हूँ।

**मिलन म्हात्रे** :-

या महापालिकेचे विद्यमान आयुक्त सन्मा. आर. डी. शिंदे साहेब आपल्या कार्याकालाला आज एक वर्ष पूर्ण झालेले आहे. गेल्या वर्षी आपण जेंव्हा हा पदभार सांभाळला त्यावेळी मी एक वाक्य बोललो होतो की, या मिरा भाईंदर शहराकरिता कर्तव्य कठोर आणि कठोर निर्णय घेणारा आयुक्त आम्हाला हवा आहे आणि सदर काम करित असताना आपल्याला काही धाडसाचे, काही कठोर निर्णय घ्यावे लागतील आता आमच्या नशिबामध्ये दोन महिने काम मत कर नावाचे अधिकारी आले होते. त्यांनी नावाप्रमाणेच काम काहीच केले नाही. दोन महिने आमचा कोणीही वाली नव्हता. ना तुम्ही नव्हते, ना ते नव्हते. तर त्याकरिता आम्ही प्रेमाने त्यांना काम मत कर बोलतो. तर आता आपण आलेले आहात परंतु काही या शहरामध्ये सत्य असते ते बोलले पाहिजे. नुसती स्तुती करणे हे पण फार महत्वाचे मी मानत नाही. आपण बघत होता की, काही निर्णय लवकर व्हायला पाहिजे होते ते आपण केले असते तर बरे झाले असते. पण ते योग्य वेळी घेतले गेले नाहीत. प्रशासनाची सुसुत्रता पण अजूनही आणायला हवी आहे. असे मला स्वतःला वाटते. पण त्यामध्ये बऱ्याचशा चुका आहेत आयुक्त या नात्याने आपण सर्व विभागीय कार्यालयामध्ये हजेरीच्या अगोदर फिरले पाहिजे. आमच्या तत्कालीन नगरपालिकेच्या वेळेला जाधव साहेब म्हणून प्रशासक होते. या भाईंदर शहराला त्यांच्या सारखा कर्तव्यदक्ष अधिकारी दुर्दैवाने दोन ते तीन महिने मिळाले. दिलीप पायगुडे सारखे चांगले अधिकारी मिळाले. सक्षम होते परंतु ते या शहराला मानवले नाहीत, हजम झाले नाही आणि दुर्दैवाने त्यांची बदली म्हणजे जाधव साहेबांचे टर्मस् पूर्ण झाली आणि पायगुडे साहेबांना मंत्रालयातुन सेटिंग लावुन इकडून जावे लागले. ही सत्य परिस्थिती आहे. या शहराला चांगला अधिकारी हजम झालेला नाही आणि जाधव साहेब असताना ते स्वतः पावणेदहा वाजता, साडेनऊ वाजता स्वतः जरी नगरपालिकेची गाडी नसली तर साडेनऊला या इमारतीमध्ये येऊन बसायचे. दहाचा काटा दहावर आला की आपले रजिस्टर मस्टर स्वतःजवळ ठेऊन कुठल्याही कर्मचाऱ्याला नंतर स्वाक्षरी करुन देत नसत. आल्या आल्या त्यांनी सर्व डिपार्टमेन्टला शिस्त म्हणून सगळ्यात पहिले घडयाळे दिली आणि ती लावली. प्रत्येक दालनामध्ये घडयाळ लागले, ते जाधव साहेबांमुळे आणि थोडी प्रशासनामध्ये दोन महिन्यापुरतीच चांगली सुसुत्रता आली. नंतर ते अधिकारी उंचीला कमी होते त्यामुळे गर्दिने दिसत नसत. पण प्रत्येक क्लार्कच्या टेबलवर जाऊन ते बघायचे तो काय करतो आहे? हा त्याचा अधिकारी म्हणून कर्तव्याची जी काही काम करायची पध्दती होती ती एवढी चांगली होती की, प्रत्येक डिपार्टमेंटला जाऊन, ते पब्लिकमध्ये जाउन उभे राहायचे आणि बघायचे कसे काम चालले आहे ते. तर ती अपेक्षा आम्ही तुमच्याकडून करतो आहे. मी सन्मा. महापौराना पण बोलतो की आपले प्रशासन कसे चालले आहे हे तिकडे गेल्याशिवाय कळणार नाही. प्रत्येक विभागीय कार्यालयाला सडनली आपण अनपेक्षित सरप्राईज भेट दिली पाहिजे. अजून आपण सुधरवू शकता. आपल्या हातात बरेच काही आहे. अजून सगळे काही गेलेले नाही. आपली सुरुवात आहे. माझी अशी स्पष्ट विनंती आहे, आपल्याकडचे जे कर्मचारी आहेत कनिष्ठ, वरिष्ठ त्यांचे कॅटेगिरी किंवा डेझिग्नेशन माझे हे नाही पण आज हे कर्मचारी आपल्या कामगिरीवर रुजू आहेत का? ते फुकटचे पगार खातात का? ते कामावर

येतात का? कामावर न येता पगार मिळतो का? तर त्यांच्यात आपण जरा स्वतः सुसूत्रता आणावी. याच्यामध्ये मागे माझी एवढीच कळकळीची विनंती आहे की, त्याचा परिणाम आपण वरिष्ठ अधिकारी आहात. पब्लीकची कामे झाली नाहीत, तर ती जनता तुमच्याकडे येते. जर तोच कर्मचारी वर्ग व्यवस्थित काम करत असेल, तर तुमच्याकडे त्रास आणि तक्रारी कमी येतील, हे मी बोलतो ते सगळयांना ऐकायला हजम होणार नाही. पण जे सत्य आहे ते सत्य आहे. या कामामध्ये सुसुत्रता आणावी. आपल्या भविष्यातील जो मिरा भाईंदर महापालिकेतील अधिकारी म्हणून जो प्रवास आहे तो चांगला जावो. आपले या शहरामध्ये चांगले नावलौकिक व्हावे, अशी माझी स्वतःची माझ्या पक्षाच्या वतीने मी भाईंदर जनता दलाच्या वतीने आशा व्यक्त करतो. जय हिन्द.

**लिओ कोलासो :-**

मा. पीठासन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, मी फक्त आपले लक्ष याच्यासाठी वेधतो की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी आपल्या भाषणामध्ये खामतकर साहेबांबद्दल अनुलेख केलेला आहे की काम मत कर. तर जो अधिकारी या ठिकाणी उपस्थित नाही. तर त्याच्या गैरहजेरीमध्ये अशाच पध्दतीची टिका-टिप्पणी करता कामा नये. हे कामकाजातून काढून टाकावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पिठासन अधिकारी की परवानगीसे बोल रहॉ हू। पिछली महासभामे इस सभागृहमें जब चर्चा का विषय चल रहा था। भारतीय जनता पार्टीकी वरिष्ठ नगरसेविका जो पिछले तीन टर्मसे चुनके आ रही है। चर्चा के समय उनको थोडा हृदयविकारका झटका आया। और बादमे इसी सभागृहसे उन्हे हॉस्पिटल मे दाखल किया गया और यहाँ फिर भी उनकी प्रकृती अच्छी भी है। फिर भी के अनेक गणमान्य नगरसेवक, नागरिक उन्होने उनको शुभेच्छा दी। आज उनकी प्रकृती अच्छी भी है फिर भी अभी तक उतनी सुधारित नही है। तो इस सभागृह की ओर से कहते है की, दुवा देनेवाले की दुवा लगती है। यहॉ के सभी सन्मा. नगरसेवक, अधिकारी की उनकी प्रकृती जल्दी से जल्दी सुधरे और उनको जल्दीसे सभागृह मे आने का मौका मिले ऐसे ईश्वर चरणी प्रार्थना मै इस सभागृह मे सुचना या प्रस्ताव मांड रहा हु।

**रक्षा शहा :-**

मा. महापौरांच्या आदेशाने बोलू इच्छिते, मी. १३/१०/२००३ ला एक प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर मला गेल्या सभेमध्ये मिळालेले नाही आणि त्याच विषयावरती आज चर्चा या ठिकाणी होत आहे. मी मा. आयुक्त साहेबांना विनंती करते की, माझ्या प्रश्नाचे उत्तर आपण मला तोंडी दिले तरी चालेल आणि नंतर सभेला सुरुवात करावी. कारण प्रश्न देऊन एक महिना झाला आहे.

**मा. आयुक्त :-**

आपल्या प्रश्नाचे उत्तर मी या महासभेनंतर देखील देउ शकतो. आपण माझ्या केबिनमध्ये मला भेट. या महासभेचा तो विषय नाही. त्यामुळे त्याची चर्चा आपण या ठिकाणी कृपा करुन करु नका. मी आपल्याला उत्तर देतो. मी या ठिकाणी महापौरांच्यासमोर कबुल करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब ज्या विषयाला मतदान होणार आहे त्या विषयावर प्रश्न आम्ही तुम्हाला विचारला होता आणि आज मतदान होताना आपल्याकडून तसे उत्तर पाहिजे की हे नियमात आहे की नाही आम्हाला प्रोसीडींगमध्ये नोंद होउ दया आम्हाला तुम्ही उत्तर नाही दिलं तरी चालेलं कारण हा प्रश्न त्यांच्याशी संबंधित आहे या विषयाशी संबंधित आहे. आम्ही विचारलेला प्रश्न असा आहे की, ग्रामपंचायत, नगरपालिका किंवा महापालिकेने केलेले प्रस्ताव नामकरण रस्ते, चौक यांना महापालिका किंवा नगरपालिकांना बदलण्याचे अधिकार आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. आयुक्त साहेब यांच्या परवानगीने बोलतो, ग्रामपंचायतीचा ठराव क्र. ४ दिनांक २९/१२/८१ अन्वये अगोदर या रस्त्यास जैन मंदिर पथ असे नाव देण्यात आले होते. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम समितीने ठराव क्र. १९ दिनांक १४/१२/९८ अन्वये देवचंद नगर असे नामकरण प्रस्थापित केले. त्यानंतर नगरपरिषदेच्या स्थायी समितीचा ठराव क्र. २६३ दिनांक ६/१०/२००१ अन्वये देवचंद जेठालाल संघवी असे नामकरण देण्याचे ठरविले. सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर मी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आम्ही प्रश्न विचारला फक्त महापालिकेला नगरपालिकेचा, ग्रामपंचायतीचा ठराव रद्द करण्याचा अधिकार आहे की नाही एवढेच विचारले होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, सभेचे कामकाज नियम यानुसार प्रत्येक सहा महिन्यानंतर कोणत्याही ठरावामध्ये फेरफार करण्याचा, त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार महासभेस आणि सर्वसाधारण सभेस आहेत आणि तशा स्वरुपाचे ठराव त्या सभेने केलेले आहेत आणि ते ठराव विधीसंपंन्न आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या स्थायी समितीने जे ठराव केले त्यामध्ये सिरीयल नं. ३८ शशिकांत शहा शेठच्या ऑफिसने एकविरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याला देवचंद नगर नाव दिलेले आहे. तो तसाच कायम आहे का तोही बदली केलेला आहे. कारण त्यामध्ये आहे की, जे स्थायी समितीला तुम्ही ठराव देता. नंतर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटलांचे देवचंद नगर मार्ग हे ३८ नंबरमध्ये नाव आहे. तेही बदली करणार की ते पण तसेच ठेवणार आणि हे पण नवीन नाव येणार आहे. ३८ नंबर तुम्ही बघा.

**रक्षा शहा :-**

फक्त यालाच नवीन नाव देणार की ते पण चेन्ज करणार आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

स्थायी समितीचा ठराव क्र. २६३ हा आजच्या स्थितीला अस्तित्वात आहे. त्यामध्ये कोणत्याही तऱ्हेचा फेरबदल झालेला नाही. आणि तो विधी समंत आहे. असे प्रशासन समजते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपल्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळालेले आहे. सचिव साहेब आपण मतदानाच्या प्रक्रियेला सुरूवात करावी.

**प्र. सचिव :-**

मागील सभेत दोन प्रस्ताव आले होते त्यापैकी शेवटचा प्रस्ताव सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांचा होता. त्या मतदानासाठी मी पुकारणा केली होती. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांचा प्रस्ताव होता देवचंद जेठालाल मार्ग असे नामकरण असावे. त्या ठरावाच्या विरोधात किती आहेत. त्यांनी प्रथम हात वर करून नोंदवायचे आहे. त्यानंतर या ठरावाच्या बाजूने कोण असेल त्यांनी हात वर करायचा आहे. नंतर तटस्थ असणाऱ्यांनी हात वर करायचा आहे. प्रथम मी सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांचा जो ठराव आहे. त्यांच्या विरोधात कोण आहेत, त्यांनी हात वर करावेत.

**रमेश जैन :-**

मा. महापौर साहेब, मेरा इसमे विरोध लिखा था क्योंकी ये अन्याय जैन समाज के साथ मे। मै यह कहना चाहता हूँ, जब मै बोलना चाहता हुँ आप हमारा सुनना नही चाहते। वास्तविकता क्या है उसको हम समझना चाहते है। आप सुनना नही चाहते। इसलिए आप मतदान करना चाहते है। उसमे मेरा विरोध है। इसको प्रोसिडींग मे नोट किया जाए।

**मा. महापौर :-**

ऐसा है की आज की तहकुब सभा है। और तहकुब सभा जिस परिस्थिती मे खतम होई थी इसके पहलेवाली सभा। वहीसे उसकी शुरुवात कि जाती है। यह तो आयुक्त साहब का एक साल का कार्यकाल पुरा हुआ। सभी लोगोने उनको शुभेच्छा दी, इस के लिए आधा घंटा गया। वर्ना मतदान की प्रक्रिया शुरु होनी चाहिए थी।

**रोहिदास पाटील :-**

पिठासिन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो मी एक निदर्शनास आणू इच्छितो की जसे आपण कामकाज कुठे सुरु करावे. त्या दिवशी सभागृहाची परिस्थिती होती त्यावेळी मला जेवढे आठवते तेवढे मी नक्की सांगू इच्छितो की डॉ. जैन इंग्रजीमध्ये बोलत होते. एका बाजूने मतदानाची चर्चा चालू सुरु होती. सभागृह नेते लिओ कोलासो तो विषय असा घ्यावा असे मांडत होते आणि त्यावेळी डॉक्टरांचे भाषण चालू होते आणि सन्मा. सदस्य कैलासबेन जानी खाली पडल्या अशी ती स्थिती होती. त्यामुळे डॉक्टरांना बोलू देऊ नये या मताशी मी सहमत नाही. त्यांना बोलायला दयायला पाहिजे. सभागृहाचा फार वेळ जाईल अशातला भाग नाही. त्याचे काय अर्धा-पाउण तासाचे भाषण नाही. पण त्यांना बोलू न देता सभागृहाचे कामकाज चालू करता तर ते योग्य होणार नाही. जी वस्तुस्थिती होती ती

तुमच्यासमोर आणलेली आहे. आपण योग्य निर्णय द्यावा. डॉक्टरांचे भाषण अर्ध्या तासाचे होणार नाही. त्यांना परवानगी द्यावी अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर :-**

डॉ. रमेश जैनना काय बोलायचे ते बोलू शकता.

**रमेश जैन :-**

मा. महापौर के परमिशनसे मै जैन मंदिर मार्ग मे अपने विचार रखना चाहता हूॅं। किसी भी व्यक्ती विशेष का नाम बदलने पर उन को गॅझेटमे पेश करना पडता है। किसी भी देश राज्य या शहर का इतिहास कभी भी नही बदलता है। उसकी भौगोलिक स्थिती बदलती है। महात्मा गांधी को इस देश का राष्ट्रपिता के नाम से जानते है। क्या आप उसको चेन्ज कर सकते है। मोहम्मद गझनवीने सतरा बार इस देशपर आक्रमण किया क्या उसको हम चेन्ज कर सकते है। राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी के नेता मा. गिल्बर्ट मेंन्डोसा को मिरा भाईंदर का प्रथम नगराध्यक्ष नवाजा गया है। क्या आप उसको चेन्ज कर सकते है। प्रथम महापौर का किताब श्रीमती मायरा मेंन्डोसा, उपमहापौर का किताब श्री. मुजफ्फर हुसेन साहब को, प्रथम स्थायी समिती अध्यक्ष का किताब श्री. मोहन पाटील को, प्रथम आयुक्त का किताब शिवमुर्ती नाईक को दिया गया। क्या आप उसको बदल सकते है। मिरा भाईंदर का जो बावन जिनालय मंदिर है वो एक ऐतिहासिक है। और उस तरफ जानेवाले रास्ते का नाम जैन मंदिर मार्ग ग्रामपंचायत के समय मे ठराव क्र. ४ दि. २९/१२/८१ को पास किया गया था। तब उस रोड का नाम जैन मंदिर मार्ग प्रसिध्द है और २७/८३ को ग्रामपंचायत के पुराने ठराव के अनुसार सभी मार्ग के बोर्ड लगाने का ठराव पास किया गया था। मा. आयुक्त साहब की इस मिरा भाईंदर के ऐतिहासिक दरोहर किए बगर चेंज नही करते की तरफ जानेवाले रास्ते का राज्यपाल के व्दारा निर्दिष्ट किए बगैर चेंज नही करते। सन्मा. वरीष्ठ नगरसेवक, पूर्व नियोजित सभापती, पूर्व स्थायी समिती अध्यक्ष मिरा भाईंदर महानगरपालिका, पूर्व सभाध्यक्ष श्री. ध्रुवकिशोर पाटील, सन्मा. नगरसेवक आसिफ शेख, जैन समाज के शिष्टमंडल के साथ ३/४/२००२ को शिवमुर्ती नाईक साहब को भेट करके ग्यापन दिया था। और जैन मंदिर नाम रखा जाए। सन्माननीय नगरसेवक मोहन पाटील से मै पूछना चाहता हूॅं। गत महासभामे जो आपने पत्र पढे थे। जो एक दुखयोगी बात है की, जो अधिकारी लोगोको पढने चाहिए वो सन्मा. सदस्य मोहन पाटीलने पढे थे। मै उनको पुछना चाहता हू, की जब वो नियोजन समिती के अध्यक्ष थे, क्या वो पत्र उस समय दिए गये थे क्या? जावक क्रमांक उसमे लिखा है क्या? क्या वो अभी के पत्र है? क्योंकी इन्होने गटनेताकी सभामे अपने स्टेटमेंट अलग दिए थे। लास्ट सभामे ये स्टेटमेंट अलग दिए। मा. प्रभारी आयुक्त शिवमूर्ती नाईक साहब को जैन समाज का शिष्टमंडळ लेके गये थे और सन्मा. सदस्य मोहन पाटील अपने पार्टीके नगरसेवक सुदामा नगरमे जो नवरात्री महोत्सव हुआ था। उस समय सार्वजनिक रुप से ये बताया गया था। अगर जैन मंदिर मार्ग नही हुआ तो हम नगरसेवक पदसे इस्तिफा देंगे।

**मोहन पाटील :-**

चार वेळा माझे नाव घेतले पण मी पत्र वाचले नाही .

**रमेश जैन** :-

उसमे जब आप नियोजन समितीमे अध्यक्ष थे। क्या उसमे किसी नगरसेवक या संस्था के सदस्य था मंदिर के ट्रस्टी महोदय या देवचंद जेठालाल संघवी के फॅमिली सदस्य द्वारा आपको कोई शिफारस पत्र मिला है क्या? हमारी छोटी सी गलती को मिरा भाईंदर के इतिहास मे काले अक्षरो मे लिखा जायेगा। ये जो आप छोटीसी भुल कर रहे हो। जैन मंदिर मार्ग बदलने को काले अक्षर मे लिखा जायेगा। कॉंग्रेस पार्टी के सन्मा. सदस्या रिटा शाहने लास्ट महासभामे कहा था की ग्रामपंचायत के ठराव की प्रतिलिपी की जगह कुछ और डॉक्युमिंट पेश किये गये। मै उनको बताना चाहता हूँ की, ग्रामपंचायत ठराव की प्रतिलिपी हमको उपआयुक्त श्री. केळकर साहब के हस्ताक्षर ५/३ रविवार दोपहर १२ बजे मुझे प्राप्त हुइ। जब की ३/१० रात को ८.३० बजे तक महानगरपालिका प्रशासन के पास कॉपी उनके पास नही थी। उसके बाद शनिवार, रविवार को महानगरपालिका बंद थी। उसके बाद हमे रविवार को पेश की गई। कॉंग्रेस पार्टी के सन्मा. नगरसेवक दिनेश नलावडेने अगली महासभामे अपने व्यक्तित्व दिये थे। मैने उस प्रभाग मे जाकर सर्वे किया था की, देवचंद जेठालाल संघवी मार्ग चाहिए। मै उनको पुछना चाहता हुँ की आपने अधिकृत रुप या अनधिकृत रूप से सर्वे किया था? परंतु श्री. महावीर जैन अनुयायी संघ समिती की तरफ से हम बीस बिल्डिंग के रहीवासियों के हस्ताक्षर विभिन्न संस्थाओ के पत्र ऐतिहासिक १२००० लोगो के मिरा भाईंदर जनता के हस्ताक्षर किये हुए है। अभी १९९७ मे मिरा भाईंदर नगरपालिकाद्वारा निर्मित बोर्ड का उद्‌घाटन के फोटो और न्युज पेपर

कटिंग नगरपालिका, महानगरपालिका को पेश किया हुआ है। सन्मा. सदस्य दिनेश नलावडे, श्री. महावीर जैन अनुयायी समिती अध्यक्ष के नाते प्रभाग क्र. २६ ही नही। मै छाती ठोक के कहता हू। मिरा भाईंदर नगरवासियोंका सर्वे किया जाए। मा. आयुक्त साहब मिरा भाईंदर नगरपालिका क्षेत्र मे सभी समुदाय के लोग अच्छे माहौल, सद्भावना, सहिष्णुता के साथ रहते है। इस माहौल को मेन्टेन करना महानगरपालिका प्रशासन, पुलिस प्रशासन, जनप्रतिनिधि का काम है। एक आय.ए.एस. पोस्ट एक कलेक्टर की पोस्ट के बराबर होता है। एक जिल्हा का राजा कलेक्टर होता है। और महानगरपालिका का राजा आयुक्त साहब होते है। आपको दलीय राजनीती से उपर उठकर मिरा भाईंदर क्षेत्र मे सुख, अमन, चैन और सद्भावनापूर्ण वातावरण बनाना है। प्रयत्न करना चाहिए। आपको अपने विचार महासभामे देने चाहिए। हमारा पहला प्रश्न है क्या जैन मंदिर मार्ग महामयीन नगरपालिका के समय महामयीन राज्यपालद्वारा निर्देश किया गया है या नही? दुसरा सवाल, महाराष्ट्र के महानगरपालिका के समय राज्यपालद्वारा जैन मंदिर मार्ग निर्देश किया गया है या नही? क्या आयुक्त साहब अपने अधिकार मे कॅन्सल कर सकते है या नही? कर सकते है, तो किस अधिनियम के तहत कर सकते है। अगर आपको इसमे किस तरह की हो तो आप लिगल ॲडव्हाइजर के पास इस की राय पुछ सकते है। धन्यवाद।

**अनंत पाटील** :-

जी आपली मतदानाची प्रक्रिया चालू करण्यापूर्वी मा. उपआयुक्त साहेब यांनी जे म्हटले आहे की, सहा महिन्यानंतर स्थायी समितीचे जे ठराव असतात ते रद्द होतात, असा कलम कोणता ?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील रद्द होतो असे मी म्हटले नाही. त्यामध्ये फेरबदल किंवा बदल करण्याचे अधिकार सभागृहास आहेत असे मी बोललो आहे.

**अनंत पाटील** :-

फेरबदल करण्याचे अधिकार त्यामध्ये असू शकतील. परंतु असेही जे विषय सुची नगरसेवकांना मिळाली त्यावेळी बऱ्याचश्या नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये जुनी नावे गायब होऊन नव्या नावांना प्राधान्य दिले आहे. तशा तऱ्हेचे तुम्ही म्हटल्याप्रमाणे सर अरुण कुमार वैद्य, मी स्वतः सरपंच असताना तो ठराव केलेला आहे. परंतु त्याच्यात कान्होजी आंग्रे मैदान असे नामकरण केले आहे. म्हणजे हा जो विषय तुम्ही आणलेला आहे तो संबंधित जुन्या नावांना वगळून नवीन नावाना प्राधान्य देणे आवश्यक होते. परंतु याच्यामध्ये काही सहा महिने असतील तर त्यामध्ये सुध्दा जैन मंदिर हे पूर्वीपासून नाव असल्याकारणाने तुम्ही ते नाव ठेवणे आवश्यक होते. तर अशाही काही त्रुटी आहेत की, या मतदानाच्या प्रक्रिया चालू होण्यापूर्वी विचार करणे आवश्यक आहेत. कारण अशा बऱ्याच ठिकाणच्या त्रुटी निघू शकतात. एकाच वेळी तो विषय होउन जाईल. उदाहरणार्थ गोडदेव चौकासाठी नामकरण त्याच्यामध्ये केलेले नाही. गावालादेखील वगळले आहे. तर सर्व संमतीने नगरसेवकाच्या अडचणी असतील किंवा ह्यांना विचार मांडायचे असतील तर त्यांना देखील संधी मिळेल

**मोहन पाटील** :-

महापौर साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो सन्मा. सदस्य डॉक्टर रमेश जैन यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला या ठिकाणी. सभागृहामध्ये जेव्हा आम्ही आमच्या माहितीप्रमाणे बोलतो. ज्या विषयाची आम्हाला जी माहिती आहे त्या विषयाच्या माहितीप्रमाणे आम्ही या ठिकाणी उद्घोष केला की, अशा संख्येने अशा अशा पध्दतीने त्याला समर्थन केलेले आहे. हे आमचे मत आम्ही मांडलेले आहे. आमचे मत आपल्याला खोडायचे असेल तर आपण डायसला विचारावे. आमच्याकडून खुलासा मागू नये आणि प्रत्येक सदस्याला आपले मत मांडायचे अधिकार आहेत. प्रत्येक सदस्य मते फोडायला आपण बसलो तर मला वाटते सभागृह चालणारच नाही आणि मी महापौर महोदयांना या ठिकाणी नम्र विनंती करू इच्छीतो की, त्याच्यावर भरपूर चर्चा झालेली आहे आणि आपण ठरावाचे पुढचे प्रोसिजर सुरु करावे अशी आम्ही आपल्याला विनंती करित आहे. कारण ज्यावेळी सभा संपुष्टात आली त्यावेळी जी स्थगित सभा झाली त्यावेळी मतदानाची वेळ आली होती. कृपया आपण या सभागृहाची वेळ न घालवता आपण यावेळी याक्षणी त्यांचे जे निवेदन होते ते सांगितले आहे. आपण कृपया मतदानाला सुरुवात करुन सभागृहाचा वेळ वाचवावा, अशी मी नम्र विनंती करतो.

**शशिकांत शाह** :-

मा. महापौर मॅडम के आदेश से मै बोलना चाहता हुँ की इस नाम के लिए मिरा भाईंदर महानगरपालिका और उसके पहले जो नगरपालिका थी उसके सन्मा. नगराध्यक्ष जब देवचंद नगर बावन जिनालय जैन मंदिर मे एक बडा महोत्सव था। हमारी संपूर्ण कमिटीने, पैतीस लोगोने और वहॉ

के पुरे जैन समाजने विनंती की थी की, देवचंद जैठालाल संघवी मार्ग इस रोड को दिया जाए। और उसी के बारे मे हमने तीन प्रपोजल रखे थे। पहले साठ फुट रोडसे आने के टाईम पे भगवान महावीर को २६०० वर्ष पूर्ण हुए थे। उसके बाद जिन्होने ये मंदिर की जगह जिन्होने इस मिरा भाईंदर क्षेत्र के अंदर विकास मे साठ फुट रोड के अंदर संपुर्ण जमीन दिया हुआ था। और १९७० मे जब यहाँ पर कोई भी वस्ती नही थी। तब सिर्फ पाचसौ रुपये के अंदर और पंधरा रुपया भाडे के अंदर ये देवचंद नगर चाली का निर्माण किया था। उस रोड का विकास उन्होने खुद के पैसे से किया। मंदिर की संपुर्ण जमीन उन्होने खुदने मंदिर को दि है। और इस विश्वस्त को १९८१ मे बनाया गया था। देवचंद नगर चाली मे एक छोटा मंदिर था। और वो मंदिर के लिए पंचायत ने ठराव किया था। पंचायतने ऐसे कही ठराव किये है। साठ फूट रोड को लालबहादूर शास्त्री मार्ग दिया गया था। उसका जो नाम था वो आंबेडकर मार्ग रखा गया है। इस तरह से बदली होती रही है। ऐसा नही हे की, पंचायतने किया हुआ सभी कुछ अंमलमे आया हुआ है। ऐसा भी मोती नगर है उसका नाम किया स्वामी विवेकानंद पथ तो उसको जय अंबे मार्ग रस्ता क्योंकी वहॉ पर मंदिर बना हुआ था, अंबा माता का। वहॉ के लोगो की मागणी थी। उस हिसाब से फेरफार किया हुआ है। आज मै बोलता हुॅ की देवचंद जेठालाल संघवीने भाईंदर के विकास के अंदर भाईंदर का स्मशान भूमी हो, टेलिफोन एक्सचेंज हो। आज टेलिफोन एक्सचेंज के लिए दस हजार वार जगह उनके माध्यम से मिरा भाईंदर क्षेत्र को दिया गया था। पानी की टाकी के लिए जो आज साठ फुट रोड पे है उसी के लिए उनकी जगह मे से दिया गया था। आज मै बोलता हुॅ की, उन्होने पूरा भारत भर मे और विशेष करके महाराष्ट्र मे जो बावन जिनालय एकमेव है। उनका संपूर्ण खर्च करके उनकी संपूर्ण निगरानी करके वो मिरा भाईंदर समाज को दिया गया है। और उनके सुपुत्र उनके माध्यम से आज पता चल रहा है। हमारे सभी मंदिरोके ट्रस्ट मिरा भाईंदर नगरपालिकाको ठराव करके दिया हुआ था। इस ठराव को मान्यता दी गई थी। आज मै बोलता हूॅ। देवचंद जेठालाल जिवित रहते थे तो हम उनका नाम नही देते थे। क्योंकी जब आदमी का स्वर्गवास होता है, उनका ये सबकुछ होता है। उनका आकस्मिक निधन हो गया। उन्होने हिम्मत नगर डिस्ट्रीक्ट के अंदर स्कूल निकाली थी। उस स्कूल के अंदर पाच हजार बच्चे पढते है। और पुरा गुजरात मे हिमत नगर डिस्ट्रिक्ट वो टाइम स्मशान यात्रा के लिए बंद रही थी। और उनको वो जो संकुलन था उसके अंदर अग्निदहन दिया था। और वैसे पुरुष को हम बोलते है क्या किया हुआ है? उन्होने बहुत कुछ किया हुआ है। बहुत कुछ उनके लडके भी कर रहे है। और उनकी स्मृती मे ये नाम दिया गया है। मेरा मिरा भाईंदर महानगरपालिका को धन्यवाद है की इस ठराव को आप सर्वानुमत से पास करके इस महान विभूती को सन्मान देंगे। ऐसी शुभेच्छा व्यक्त करके मै मेरा बोलना पूर्ण करता हुॅ।

**रक्षा शाह** :-

मला आयुक्त साहेबांच्या परवानगीने एक विचारायचे आहे जे आता केळकर साहेबांनी सांगितले की सहा महिन्यात स्थायी समितीमध्ये येऊन जे प्रस्ताव करता येतात. तर का दरवेळी हे प्रस्ताव रदद करणार का? आम्ही पण सहा महिन्यानंतर असा ठराव दिला आहे की, हा मार्ग या नावाने बदला तर दर सहा महिन्यानी ते करता येते का? आणि हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये रद्द झालेला आहे, तर त्याची सत्यप्रत मला द्यावी अशी मी विनंती करतो.

**मा. आयुक्त** :-

सन्मा. सदस्य रक्षाबेन शहा यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आमचे उपआयुक्त केळकर साहेब यांनी दिलेले आहे यामध्ये एक महत्वाचे महानगरपालिकेच्या कायदयामधील नगरपालिकेची जी कर्तव्य आहेत ती कलम ६३ मध्ये दिलेली आहेत. तशा प्रकारचा ६३(९) या कलमामध्ये उल्लेख आहे.

**रक्षा शाह** :-

परंतू ते दर सहा महिन्याला बदलता येते का ?

**मा. आयुक्त** :-

दुसरी गोष्ट अशी की ते बदलता येत नाही असे नाही कायदयाने तसे करता येते. परंतु असे ठराव कारणाशिवाय बदलायचे का? हे ठरविण्याचा अधिकार हा ह्या सभागृहाचा आहे. सर्वच मागे घेतलेले ठराव जर बदलले तर कायदयामध्ये सुध्दा अडचण निर्माण होउ शकतात. त्यामुळे बदलावे किंवा बदलू नये हे संपूर्णतः आपल्या सभागृहाच्या निर्णयावरती आहे. याच्यामध्ये अधिकाऱ्याने उत्तर देण्यासारखे काहीही नाही.

**रक्षा शाह** :-

परंतू यात खूप वाद झालेला आहे. सहा महिने काय तर दहा महिने निघून गेले आहेत . जर हे वाद प्रकरण होत असेल तर जैन मंदिर मार्ग हे एक ऐतिहासिक नाव आहे त्यात कोणाला ऑब्जेक्शन घ्यायला नको.

**मा. आयुक्त** :-

ह्याचा निर्णय सर्व सभा. सदस्यांनी घ्यायचा आहे.

**रक्षा शाह** :-

आणि देवचंद जेठालाल आम्हालाही सन्मा. आहे. ह्यांचे नाव आम्ही सांगतो त्याप्रकारे देवचंद नगर चाळीवर तिकडे बोर्ड रिकामी पडले आहे देवचंद जेठालाल त्या ठिकाणी लावावे. आमची पण मागणी आहे की, त्यांचे नाव तिकडे दयावे आणि जसे मा. सदस्य शशिकांत शाह यांनी सांगितले की आमचा प्रोग्रॅम होता. त्यावेळी जैन समाजाने देवचंद जेठालालचे नाव सुचविले होते या रस्त्याचे धर्मसुरी नाव सुचविले होते माझे असे म्हणणे आहे की बावन जिनालय चौक असे त्यांनी कॉंग्रेस ऑफिसवर बोर्ड लावलेले आहे. ते चुकीचे नाही का? तिकडे कुठला चौक आला ते तरी आम्हाला दाखवा.

**मा. आयुक्त** :-

मला वाटते प्रशासनाने उत्तर दिलेले आहे, सभागृहानेच निर्णय घ्यायचा आहे.

**रक्षा शाह** :-

साहेब, उत्तर कुठे दिले ते तुम्ही सांगा मा. आयुक्त साहेब मला उत्तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रक्षा शाह आपल्याला केळकर साहेबांनी आणि आयुक्त साहेबांनी सुध्दा उत्तर दिलेले आहे. आपण बोलण्याची परवानगी मागितली म्हणून आपल्याला अंतिम विषयावर बोलण्याची परवानगी देण्यात आली आपले ऐकून घेतलेले आहे. उत्तर ऑलरेडी आपल्याला दिलेले आहे.

**रक्षा शाह** :-

पण आम्ही नवीन सदस्य असून काही गोष्टीची आम्हाला माहिती नाही. ते तरी आम्हाला कळू द्या. चौक कुठे आला? त्या रस्त्याचे नामकरण झाले तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही वोटिंग पण करणार आहे. पण एक कॉंग्रेस ऑफिसवर बावन जिनालय चौक असे बोर्ड पण लागलेले आहे.

**मा. महापौर :-**

त्या संदर्भामध्ये जास्त माहिती घेण्याकरिता आयुक्त साहेबांची वेगळी भेट घ्यावी.

**रोहिदास पाटील** :-

जसे केळकर साहेबांनी सांगितले की, स्थायी समितीमध्ये हा विषय नक्कीच आहे की, या सभागृहातील अनेक सदस्य नवीन आहेत. त्यामुळे त्या निर्णयाला ते बांधील राहतील की, नाही ज्या स्थायी समितीमध्ये हा विषय झालेला आहे. त्या स्थायी समितीच्या इतिवृत्तातंची नोंद नाही असे महापालिकेने आम्हाला लिहून दिले आहे. आपण कशाची अंमलबजावणी करतो? कशासाठी आपण बांधील राहतो आणि कशासाठी या नव्या सदस्यांना. आम्ही त्यावेळी जुने होतो. त्या स्थायी समितीचे आम्ही त्यावेळी सदस्य नव्हतो. उपमहापौर साहेब तुम्ही हा विषय हसण्यावर नेउ नका. आम्हाला तुम्ही कोंडीत पकडू नका. या सभागृहाला कोंडीत पकडू नका. आम्ही तुम्हाला कोणत्याही नावाला विरोध करीत नाहीत. कामकाजाबद्दल आम्ही पोटतिडकिने सांगतो की, हीच महापालिका, हेच आयुक्त, हेच उपआयुक्त आपल्याला लेखी जावक नंबर टाकून पत्र देतात की, त्या स्थायी समितीच्या इतिवृत्तांताची काही नोंद मिळत नाही. ज्या स्थायी समितीच्या ठरावाची नोंद नाही तो ठराव आजच्या महासभेत, म्हणजे पवित्र सभागृहामध्ये खरोखर सन्मानित आहे का? त्याला मान्यता आहे का? आणि त्याच्याही पलिकडे हे जे नवीन सदस्य निवडुन आलेले आहेत पहिल्या सभागृहात ते नव्हतेच. त्यांनी हे सगळे मान्य करायला तुम्ही लावता का? असा विषय आहे. आपण भाषण ऐकतो, प्रशासनही ते भाषण ऐकून घेते. सभागृहाने पक्ष पातळीवर कोणताही निर्णय घ्यावा. सभागृह नेत्यांनी त्यांच्यावर मत मांडावे. हे मत व्हॅलिड राहणार आहे. पण सगळी अंमलबाजावणी करते वेळी कुठेतरी आपण स्वतःचे अधिकार गहाण ठेवतो. अशा पध्दतीचे हे कामकाज चालते याचा मला खेद होतो. बहुमताने तुमचे ठराव अनेक येतील. याची मला चिंता वाटत नाही पण जे नको ते तुम्ही लादता. नको ती बाजू प्रशासन एका वेगळया बाजूने लादत आहे याचे आम्हाला दुःख होते. आपण याचा निर्णय द्यावा की, तुम्हीच सांगता स्थायी समितीचे इतिवृतान्त नाही, इतिवृत्तांतामध्ये त्याची मागणी कोणी केली? त्या मागणीला कोणी अधिकारी होते का? अधिकाऱ्यानी प्रस्ताव दिला आहे का? स्थायी समितीच्या कोणी सदस्यांनी प्रस्ताव दिला आहे का? त्या स्थायी समितीने त्याच्यावर मतदान घेतले आहे का? काही

आग्रह धरला आहे का? त्याचे कोणतेही इतिवृतांत नाही. पंचवीसची यादी एकशे पन्नास झाली त्याला हे स्पष्ट येणे आयुक्त साहेब आवश्यक होते की, त्या बांधकाम समितीने केलेल्या शिफारसीतील अमुक नावे ह्या ह्या कारणास्तव ह्यांनी ह्यांनी सुचना दिल्यामुळे वगळली आणि ही नावे ह्यांनी ह्यांनी आग्रह धरल्यामुळे किंवा वास्तविकता बघून शहराचा इतिहास बघून, त्या व्यक्तीचा इतिहास बघून या संघवी नावाला सभागृहातील कोणाचा विरोध असल्याचे काही कारण नाही. पण ते ज्या पध्दतीने आले आयुक्त साहेबांच्या मी निदर्शनास आणतो की, आम्ही त्यावेळी तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न केला की ती झालेली घटना आहे. ती तुम्हाला नजर अंदाज करुन चालणार नाही. ते नाव त्यावेळी द्यायला सुरुवात केली त्यावेळी शिवमुर्ती नाईक प्रभारी आयुक्त होते. त्यावेळी निंबाळकर साहेब पी.एस.आय. होते. महापालिकेने तो बोर्ड काढला होता. कोणत्या प्रक्षुब्ध जमावाने काढला नव्हता आणि तो विषय पेन्डिग न ठेवता याच्यावर चर्चा करण्याआधी आपण म्हणतो स्थायी समितीची आम्ही अंमलबजावणी करतो आणि या शहराला तुम्ही नवीन वेगळा विषय दिलेला आहे. आम्हाला या विषयाची फार चिंता वाटते. हा एका नावाशी संबंधित विषय नाही. या नावाने सन्मा. सदस्य कैलासबेन जानी आजारी पडल्या आणि डॉक्टर रमेश जैन पाच दिवस उपोषणाला बसले. इतकेच याला महत्व नाही. पण या शहरात वेगळा मॅसेज जातोय याचे मला दुःख होते आणि मुख्य मुद्यावर आपण हात घालत नाही. प्रशासनही त्याच्यावर मत देत नाही. सत्ताधारी त्याचा विचार करीत नाहीत. तुम्हाला अजून चार वर्षे राज्य चालवायचे आहे. ही सत्ता तुम्हाला उपभोगायची आहे. लोकांचा दुवा घेउन उपभोगा असे आमचे मत असताना तुम्ही बहुमताकडे नेता ही एक खेदाची बाब आहे. साहेब हे बहुमताचे विषय नाहीत, हे राजकारणाचे पण विषय नाहीत कोणत्या पार्टीचे विषय नाहीत. आमचे तीन सदस्य त्या उपोषणात बसले आहेत. त्यामुळे आम्हाला जितके प्रेमाने सांगता येईल, जितक्या नियमाचा आधार घेउन सांगता येईल तो आम्ही तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. का कुणास ठाउक हा विषय पुन्हा पुन्हा येतो आणि त्याचा तोडगा मिळत नाही दुर्देव आहे.

**प्र. सचिव** :-

नामकरणाबाबत दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रॉस रोड ते जैन मंदिर आकाशगंगा इमारतीपर्यंतच्या रस्त्याला जैन मंदिर मार्ग असे नांव द्यावे असा ठराव श्री. रोहिदास पाटील यांनी तोंडी मांडलेला आहे तो असा, बाबासाहेब आंबेडकर क्रॉस रोड, जैन मंदिर ते आकाशगंगा या रस्त्याला ग्रामपंचायतीच्या ठरावाची अंमलबजावणी म्हणून जैन मंदिर मार्ग आणि बांधकाम समितीच्या ठरावाची अंमलबजावणी म्हणून (देवचंद नगर) असे करावे व त्यास अनुमोदन श्री. रमेश जैन यांनी दिलेले आहे.

याच प्रकरणाबाबत श्री. चंद्रकांत वैती यांनी दुसरा लेखी ठराव मांडलेला आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रॉस रोड ते जैन मंदिर आकाशगंगा इमारतीपर्यंतच्या रस्त्याला देवचंद जेठालाल संघवी मार्ग असे नांव द्यावे असा ठराव श्री. चंद्रकांत वैती यांनी मांडलेला आहे व त्यास श्रीम. रिटा शहा यांनी अनुमोदन दिलेले आहे. करिता श्री. चंद्रकांत वैती ह्यांनी श्री. रोहिदास पाटील यांच्या नंतर ठराव मांडल्याने श्री. चंद्रकांत वैती ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात जे सदस्य असतील त्यांनी अगोदर हात वर करायचे आहेत.

विरोधात जे आहेत त्यांची नावे वाचून दाखवतो.

१) अग्रवाल धनराज नंदलाल
२) अग्रवाल ओमप्रकाशजी गंगाधरजी
३) सिंग मदन उदितनारायण
४) पाटील रोहिदास शंकर
५) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
६) भोईर गजानन लक्ष्मण
७) पाटील अशोक पांडुरंग
८) घोन्सालवीस जोजफ जॉन
९) भानु भगवान पाटील
१०) नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) पाटील शरद केशव
१२) शाह रक्षा एस
१३) जैन रमेश धरमचंद
१४) रतन कृष्णा पाटील

१५) अनंत पाटील
१६) शुभांगी नाईक
१७) प्रियांका करंबेळे

**प्र. सचिव :-**

या ठरावाला तटस्थ जे सदस्य असतील त्यांनी हात वर करावे.
या ठरावाला तटस्थ आहेत त्यांची नांवे वाचून दाखवतो.

१) अशोक पाटील
२) शशिकांत भोईर
३) लिला पाटील
४) सुधांशु गोयंका
५) म्हात्रे संगिता

**प्र. सचिव :-**

या ठरावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी हात वर करावे.
ठरावाच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांची नांवे वाचून दाखवतो.

१) गोविंद हेलन जॉर्जी
२) डिसुझा ज्युडी थॉमस
३) आसिफ गुलाब शेख
४) ठाकुर नितीन गोपीनाथ
५) मिलन म्हात्रे
६) तिवारी सुरेंद्रप्रसाद मुर्लीधर
७) पाटील प्रभात प्रकाश
८) डी. डी. नलावडे
९) जयंत महादेव पाटील
१०) निर्मला बाबुराव साबळे
११) रविंद्र भीमदेव माळी
१२) केशव रामभाउ घरत
१३) ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१४) जीवा हिरा वाडे
१५) अनिता जयवंत पाटील
१६) गावंड हरेष लक्ष्मण
१७) भोईर जयाबाई यशवंत
१८) सुर्यकांत भोईर
१९) गायकवाड सुरेखा यशवंत
२०) वैती चंद्रकांत सिताराम
२१) शफीक अहमद खान
२२) सय्यद मुजफ्फर हुसेन
२३) उमा विश्वनाथ सपार
२४) मेन्डोसा स्टिवन जॉन
२५) कुरेशी याकुब इस्माईल
२६) कोलासो लिओ इजिदार
२७) अल्मेडा जेन्वी युस्टस
२८) भामरे उर्मिला कोमल
२९) जैन गीता भरत
३०) रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
३१) शाह शशिकांत रतिलाल
३२) शाह रिटा सुभाष
३३) पाटील ध्रुवकिशोर मन्साराम

३४) मोहन मधुकर पाटील
३५) रांजणकर मुक्ता प्रविण
३६) परशुराम दामोदर पाटील
३७) प्रेमनाथ गजानन पाटील
३८) नरेंद्र मेहता
३९) तुळशीदास दत्तु म्हात्रे
४०) पाटील मिलन गोविन्द
४१) नयना म्हात्रे

**मा. महापौर :-**

आता सभागृहामध्ये ज्या विषयावर मतदान झाले. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जो ठराव मांडला होता. तो मतदानासाठी टाकला असता. त्याबददल विरोधात सतरा, तटस्थ पाच आणि बाजुने एकेचाळीस सदस्य होते.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहात उपस्थिती किती आहे? त्यांची किती बेरिज आहे बघा.

**प्र. सचिव :-**

एकूण ६७ सदस्य आहेत. त्यापैकी ४ नामनिर्देशित सदस्य आहेत. मतदान बाजूने ४१, विरोधात १७, तटस्थ ५ असे आहे.

सबब श्री. रोहिदास पाटील यांनी मांडलेला ठराव महासभेने मान्य केला नाही असे स्पष्ट होत आहे.

**प्रकरण क्र. ५३ :-**

भाईंदर (पश्चिम) डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रॉस रोड जैन मंदिर ते आकाशगंगा इमारत पर्यंत रस्त्याच्या नामकरणाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४१ :-**

सदर प्रमाणे यापुर्वी वरील विषयाबाबत मागील दोन महासभांमध्ये समाधानकारक चर्चा झाली आहे. तथापी यापुर्वीच नियमीत पद्धतीने नगरपालिकेने वरील रस्त्याचे नांव हे देवचंद जेठालाल संघवी असे ठेवले होते. त्यामुळे तेच नांव कायम करुन या पुढे कुठल्याही नावाचा बदल तातडीने करु नये. असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) अग्रवाल धनराज नंदलाल
२) अग्रवाल ओमप्रकाशजी गंगाधरजी
३) सिंग मदन उदितनारायण
४) पाटील रोहिदास शंकर
५) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
६) भोईर गजानन लक्ष्मण
७) पाटील अशोक पांडुरंग
८) घोन्सालवीस जोजफ जॉन
९) भानु भगवान पाटील
१०) नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) पाटील शरद केशव
१२) शाह रक्षा एस
१३) जैन रमेश धरमचंद
१४) रतन कृष्णा पाटील
१५) अनंत पाटील
१६) शुभांगी नाईक
१७) प्रियांका करंबेळे

**ठरावाला तटस्थ असलेले सदस्य**

१) अशोक पाटील
२) शशिकांत भोईर
३) लिला पाटील

४) सुधांशु गोयंका
५) म्हात्रे संगिता

**ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य**

१) गोविंद हेलन जॉर्जी
२) डिसुझा ज्युडी थॉमस
३) आसिफ गुलाब शेख
४) ठाकुर नितीन गोपीनाथ
५) मिलन म्हात्रे
६) तिवारी सुरेंद्रप्रसाद मुर्लीधर
७) पाटील प्रभात प्रकाश
८) डी. डी. नलावडे
९) जयंत महादेव पाटील
१०) निर्मला बाबुराव साबळे
११) रविंद्र भीमदेव माळी
१२) केशव रामभाउ घरत
१३) ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१४) जीवा हिरा वाडे
१५) अनिता जयवंत पाटील
१६) गावंड हरेष लक्ष्मण
१७) भोईर जयाबाई यशवंत
१८) सुर्यकांत भोईर
१९) गायकवाड सुरेखा यशवंत
२०) वैती चंद्रकांत सिताराम
२१) शफीक अहमद खान
२२) सय्यद मुजफ्फर हुसेन
२३) उमा विश्वनाथ सपार
२४) मेन्डोसा स्टिवन जॉन
२५) कुरेशी याकुब इस्माईल
२६) कोलासो लिओ इजिदार
२७) अल्मेडा जेन्वी युस्टस
२८) भामरे उर्मिला कोमल
२९) जैन गीता भरत
३०) रॉड्रिक्स मॉरस जोसेफ
३१) शाह शशिकांत रतिलाल
३२) शाह रिटा सुभाष
३३) पाटील ध्रुवकिशोर मन्साराम
३४) मोहन मधुकर पाटील
३५) रांजणकर मुक्ता प्रविण
३६) परशुराम दामोदर पाटील
३७) प्रेमनाथ गजानन पाटील
३८) नरेंद्र मेहता
३९) तुळशीदास दत्तु म्हात्रे
४०) पाटील मिलन गोविन्द
४१) नयना म्हात्रे

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. रिटा शहा.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, ठरावाच्या बाजुने ठराव बहुमताने मंजुर झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब या ठरावाचा क्रमांक किती आहे.

**प्र. सचिव :-**

आता ताबडतोब देता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब आम्हाला याचे इतिवृत्तांत जरा लवकरच पाहिजे. कारण पुढची सभा एक महिन्यानंतर आहे. त्या आधी इतिवृत्तांत मिळाले तर बरे होईल.

**रोहिदास पाटील :-**

मागणी केल्यानंतर इतिवृत्तांत पाच दिवसात देता येते ना.

**प्र. सचिव** :-

इतिवृत्तांत मंजुर झाल्यानंतर तात्काळ देता येईल. इतिवृत्तांत पुढील सभेत मंजुर झाल्यानंतर देता येईल.

**रोहिदास पाटील :-**

ह्या ठरावात तसे नाही. तुम्ही दुसऱ्या कामकाजाच्या वेळी हा मताचा जो ठराव टाकलेला आहे. याचे पाच दिवसात इतिवृत्तांत देता येते.

**प्र. सचिव** :-

स्वीकृत चार सदस्य हजर आहेत.

**(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)**

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपल्याला त्यांनी उत्तर दिलेले आहे. लवकरात लवकर मंजुरी झाल्यानंतर मिळेल. इतिवृत्तांत असे आहे की, आपल्याला सगळयांना कल्पना आहे मला आपल्याला सांगायची गरज नको की या सभेचे इतिवृत्त पुढच्या सभेला मंजुर होणार आणि मंजुर झाल्यानंतर तुम्हाला त्याची प्रत देता येईल आणि जर कमिशनर साहेबांना त्याच्या अखत्यारित त्याच्या आधी देता आले. तसा काही नियम असेल तर ते देउ शकतात.

**प्र. सचिव.:-**

सन्मा. सदस्य शशिकांत शाह यांच्या नामकरण बाबतच्या पत्राने दिलेला प्रस्ताव भाईंदर रेल्वे फाटक ते काशिमिरा नाक्याच्या रस्त्याच्या नामकरणाबाबत

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर के माध्यम से सभागृह को ध्यान मे लाना चाहता हुँ की, मिरा भाईंदर क्षेत्र ग्रामपंचायत के वो टाईम पे यहाँपर अलग अलग ग्रामपंचायत थी। मिरा ग्रामपंचायत, घोडबंदर, चेना, उत्तन, पाली, भाईंदर (वेस्ट), भाईंदर (ईस्ट), खारी, नवघर, गोडदेव। वो टाईम पे यहॉपर रोड के विविध नाम। और जो काशिमिरा रोड था उसका नाम काशीमीरा रोड रखा गया था। उसके बादमे सभी ग्रामपंचायतने ठराव न करते हुए बळीराम हेगडे नाम दिया था। परंतु आज प्रत्यक्ष महानगरपालिका होने के बादमे जो डेव्हलपमेंट हुआ है और उसके बाद मे नगरपालिकाने अपने महाराष्ट्र के आराध्य दैवत श्री. शिवाजी महाराज का पुतळा वहॉ पर आरुढ किया हुआ है। और अभी अभी महानगरपालिकाने १५० फूट को रोड और उसी के अंदर एंन्टी और उसके लिए हमारे मिरा भाईंदर के जनता की मॉंग को लेकर हमे भी बहूत पत्र मिले थे। और उसको लेकर मैने भी एक पत्र मिरा भाईंदर महासभामे दिया हुआ है। इस नाम को मेरा संपूर्ण अनुमोदन है की, इस रोड को शिवाजी महाराज पथ नाम दिया जाए। ऐसा मै ठराव मांडता हूँ।

**मा. उपायुक्त (केळकर सो.)** :-

मा. आयुक्त साहेबांच्या अनुमतीने बोलू इच्छितो, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३४० अन्वये एकूण नऊ ग्रामपंचायतीचे एकत्रित करुन नगरपालिका स्थापित झाली होती आणि नगरपालिका स्थापित झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे ३१६

अन्वये तत्कालीन प्रशासक  यांची नेमणुक केली होती. प्रशासकीय ठराव क्र. ५१७ दिनांक २८/१/९१ नुसार ठराव क्र. ५१७ नुसार या रस्त्याचे नामकरण डॉ. केशव बळीराम हेगडेवार मार्ग असे करण्यात आले होते. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शाह यांनी सांगितले ते योग्य नसून त्यांना प्रशासकीय ठरावानुसार त्याचे नामकरण करण्यात आले होते आणि महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३१६ नुसार प्रशासकांना तशा स्वरूपाचे प्रशासकीय ठराव करण्याचे अधिकार त्या वळेस होते. धन्यवाद.

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर साहेब के माध्यम से बोलना चाहता हूँ की, वो ठराव होगा। मगर जब समय के माँग के साथ मे महानगरपालिका हो गई है। उसीके साथ मे हमारी ये जरुर मागणी है। और उसको बदली होनी ही चाहिए। मै ऐसा बोलता हू की, शिवाजी महाराज ने महाराष्ट्र मे जो काम किया जो पुरे भारत भर मे काम किया है। और उनका नाम उसीको हमे रखना ही चाहिए। मेरा पुरा अनुमोदन है। मेरा ठराव है और उस ठराव को आप मान्यता देनी चाहिए।

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य शशिकांत शाह यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला मी अनुमोदन मी लिहून पण दिले आहे.

**रोहिदास पाटील** :-

पीठासन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो आहे, मिरा भाईंदर महापालिकेचे इलेक्शन झाले. या सभागृहात ८४ सन्मा. सदस्य मिरा भाईंदर शहराचे रात्रंदिवस डोळयात तेल घालून भले करण्यासाठी शपथ घेउन आले. आपापल्या पक्षाने आपापल्या पक्षाचा जाहिरनामा लोकांसमोर ठेवला आणि आधी कोणी केले नव्हते. पण आम्ही करु असे सांगून विजयी झाले म्हणून या सभागृहात प्रवेश मिळाला. जे नवीन सभासद आले त्याची अशी अपेक्षा आहे की, या सभागृहाचे कामकाज या शहराचा इतिहास याच सभागृहात आम्हाला नीटनेटका मिळू शकतो. याच्यावर त्याचा विश्वास आहे. आमची अशी धारणा आहे की, आम्ही ते नीट सांगू शकतो. याचा आम्हाला अभिमान आहे. पण ज्या पध्दतीने सत्ताधारी पक्ष संगनमताने प्रशासनाला दबावात आणून एक ठराव आणण्याचा जो प्रयत्न करीत आहे आणि शहरामध्ये वातावरण दुषित करण्याचा प्रयत्न करीत आहेत .

**प्रभात पाटील** :-

इथे बाकीच्या पक्षांचे देखील लोक आहेत. सत्ताधारी पक्षालाच कशाला वेठीला धरले जाते. दबावाचे तंत्र या ठिकाणी बोलूच नये. बाकीच्या पक्षाचे पण लोक आहेत .

**रोहिदास पाटील** :-

कोण कोणावर दबाव टाकते ते भाषणात पण येईलच. तुम्ही ऐकायची तयारी ठेवा. आधीच गोंधळ का घालता? काही गोंधळ करण्याचे कारण नाही. ऐकण्याची मानसिकता ठेवा .

**मा. महापौर :-**

माझी सभागृहाला विनंती आहे की, कृपया एक सदस्य बोलत असतांना, त्याचे विचार मांडत असतांना दुसऱ्याने बोलू नये. दुसऱ्यालाही संधी मिळेल आणि त्याला जर त्यांच्या शब्दावर किंवा भाषणावर काही आक्षेप घ्यायचा असेल, बोलायचे असेल, विचार मांडायचा असेल तर तेही मांडू शकता.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य आपापल्या परीने आपल्या पक्षाची आपल्या विषयाची इथे बाजू मांडत राहतात. ह्या शहराचा आजपर्यंत इतिहास आहे की या शहरामध्ये सर्व धर्माचे पंथाचे लोक आणि पक्षाचेही लोक अत्यंत गुण्या गोविंदाने वागत. ज्या ज्या वेळी पंचायत नगरपरिषदेचा कारभार असू दे. महापालिकेचा कारभार असू दे. पण त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला आणि त्याप्रमाणेच वागत आलो असे आम्हाला वाटते. पण आता ज्या पध्दतीने जे अंधुक वातावरण दिसायला लागले त्यामुळे सत्ताधारी पक्षाचा तो हेतु नाही आहे. सत्ताधारी पक्ष आता कोणतेच काम नाही तर हे काम करु या, अशा पध्दतीने कुठेतरी आपले नाव लौकिक होईल अशा भावनेकडे चाललेले आहे आणि प्रशासनावर दबाव कुठे असेल सभागृह नेत्यांनी जर आपला तोल सोडून उभे राहण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांना सांगतो प्रशासनावर नक्की दबाव आहे. तर त्यांना त्यांच्या अस्मितेचे काय वाटलेच नाही. ज्या सभासदाने पत्र देतेवेळी हा आरोप केलेला आहे की, महापालिकेचे, नगरपालिकेचे दप्तर पाहता असा कुठेही ठराव झाल्याचे दिसुन येत नाही. मला निश्चित माहिती आहे की, सन्मा. सदस्य शशिकांत शहा हे पंचायतचे सदस्य होते. त्यांच्या वयाच्या आणि उंचीच्या मानाने आणि त्यांच्या स्वच्छ चारित्र्याच्या मानाने ते शास्त्रशुध्द वागतात असे मला वाटते.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण जी व्यक्तिगत टिका धर्माच्या नावावरुन सन्मा. सदस्य शशिकांत शाह यांच्या नावावार केलेली आहे. कृपा करुन आपले ते शब्द मागे घ्यावे. अन्यथा आपल्याला पुढे बोलण्याची परवानगी देता येत नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण त्या ठिकाणी उभे राहून व्यक्तिगत क्रॉस एंटर करु शकत नाही किंवा चर्चा करू शकत नाही. आपल्याला भाषण करण्याची परवानगी दिली होती. मत मांडण्याची परवानगी दिली होती. आपण आपली मर्यादा सोडून या सभागृहाचा आणि सभागृहातील काही सदस्यांचा अपमानास्पद शब्द वापरल्या कारणाने आपल्याला यापुढे भाषण करण्याची परवानगी देत नाही. कृपया या विषयावर दुसऱ्या सदस्यांनी बोलावे.

**रोहिदास पाटील :-**

मग आम्ही सभागृहाच्या कामकाजात भाग घेणार नाही.

**(१२.४५ वा बी.जे.पी. सदस्यानी सभागृह सोडले )**

**अनंत पाटील :-**

हा जो ठराव आलेला आहे. हा प्रत्येक वेळी स्थायी समितीवर मंजुर झाल्याशिवाय तो महासभेवर आणू नये, असा नियम असताना आपण महासभेमध्ये मंजुर कसा करता.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील मी सांगू इच्छितो, आपण जो विषय म्हणता की, सर्व विषयांची स्थायी समितीपुढे आले पाहिजेत आणि त्यानंतर सर्वसाधारण सभेमध्ये आले पाहिजेत. हे बरोबर आहे. पण ज्या विषयावर निर्णय झालेला आहे आणि फेरविचार करावयाचा असेल तर ते अधिकार सर्वसाधारण सभेला आहेत.

**अनंत पाटील :-**

याच्यावर चर्चा झालीच नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील चर्चेमध्ये शिवाजी महाराजांच्या नावाला आपला विरोध आहे का ? असा खुलासा सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी करावा. आपला विरोध आहे का त्याला?

**रतन पाटील :-**

आमचा विरोध नसणार आमची शिवसेनेची तटस्थ भुमिका राहिल.

**मोहन पाटील:-**

शिवाजी महाराजांच्या विषयी तटस्थ भूमिका ही एक आश्चर्याची बाब आहे. आराध्यदैवत गो ब्राम्हण प्रतिपालक श्री. छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान करणारी पक्ष संघटना असणारी आणि शिवाजी महाराजांच्या विषयी त्यांनी तटस्थ भूमिका बाळगली. हा महाराजांचा अपमान आहे. शिवाजी महाराजांच्या नावाला तटस्थ. अरे काय ही आराध्य दैवताविषयी आपण चर्चा करता आणि आपण त्या नावाला तटस्थ आहात. ही आपली दुटप्पी भूमिका महाराजांच्या विषयी आहे. हे चुकीचे आहे.

**शुभांगी नाईक :-**

छत्रपती शिवाजी महाराज एकच होते. हजार नव्हते. एकच नाव छत्रपती शिवाजी महाराज होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची विटंबना करु नका.

**(सभागृहात गोधळ)**

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सर्व सदस्य महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव दिल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाची विटंबना होते असे शिवसेना सदस्यांना वाटते ते चुकीचे आहे. एका युगपुरुषाचे नाव या मिरा भाईंदर रस्त्याला दिले तर नुकसान कुठे झाले? या मिरा भाईंदर मध्ये जो घोडबंदरचा जो विभाग आहे. हा विभाग ऐतिहासिक आहे. शिवाजी महाराज येऊन गेल्याचे दाखले आहेत. मग मिरा भाईंदरच्या प्रमुख रस्त्याला जर शिवाजी महाराजांचे नाव दिले तर नुकसान होते कुठे? अशी विटंबना वाटलीच का तुम्हांला?

**अनंत पाटील :-**

शिवसेना हाय हाय बोलण्याचे पटत नाही. तुम्ही शिवाजी महाराजांचा बाजार मांडलेला आहे. आणि त्याचा आम्ही निषेध करतो.

**(सभागृहात गोधळ)**

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी सभागृहात बसून घ्यावे .

**जयंत पाटील:-**

फाटक ते काशिमिरा रोड या रस्त्याला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्यावे, असा प्रस्ताव आणि तसा ठराव सन्मा. सदस्य शशिकांत शाह यांनी मांडलेला आहे. त्याला अनुमोदन सन्मा. सदस्य रिटा शाह दिलेले आहे. बऱ्याच वेळा मी या सभागृहात नेहमी सांगतो की, मी माजी शिवसैनिक आहे. आज मला त्याची लाज वाटते. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यानंतर आपल्या अंगावर रोमांच उभे राहायला पाहिजेत.

**अनंत पाटील :-**

आता अभिमान उरलेला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे नामकरण करायचे होते . पुतळा बांधला त्याचवेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे नामकरण करायला पाहिजे होते.तुम्हाला आता कशी जाग आली ?

**जयाबाई भोईर :-**

नगरपालिका असताना प्रस्ताव मांडलेला आहे.

**अनंत पाटील :-**

प्रस्तावाची चर्चा त्यावेळी व्हायला पाहिजे होती. आता डायरेक्ट कसे आणले?

**मोहन पाटील :-**

हे नाव प्रशासकीय काळात आलेले आहे. बॉडीने घेतलेला निर्णय नाही आहे.

**अनंत पाटील :-**

शहरातील वातावरण बिघडण्यासाठी हा विषय आणलेला आहे. सभागृहामध्ये जी चर्चा होत होती ही संपूर्ण मिरा भाईंदर विकासाची होत होती. परंतु आता जो विषय आलेला आहे. तो निव्वळ दोघांमध्ये भांडणे लावण्यासाठी आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अनेक रस्त्याला दिलेले आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नावाला काळिमा होतो, असे जर त्यांचे म्हणणे असेल, तर ते खूप अज्ञानी आहेत, असे मला म्हणावेसे वाटते. त्यांच्याच माहितीसाठी सांगतो मुंबई महानगरपालिकेमध्ये आणि या महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी बाळासाहेब ठाकरेंच्या नावाने अनेक रस्ते, अनेक उद्याने अनेक अमूक या ठाकरेंचे ते, त्या ठाकरेचे ते अशी अनेक नावे आहेत. मग बाळासाहेब ठाकरेंच्या नावाला काळीमा फासला गेला का?

**अनंत पाटील :-**

आम्ही शिवाजी महाराजांच्या नावाला कधीही विरोध करणार नाही. आम्ही त्यांचेच पाईक आहोत.

**जयंत पाटील :-**

शिवसेनेचे नगरसेवक या नावाला विरोध करतात ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे. ज्यांचा जन्मच शिवाजी महाराजांचे नाव घेऊन झाला, त्या शिवसेनेने या ठरावाला विरोध करावा.

**अनंत पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव राजकारणामध्ये आणू नका.

**जयंत पाटील :-**

या सभागृहातील कामकाज नियमाप्रमाणे चालले आहे. या सभागृहातील प्रत्येक ठराव येतो तो नियमाप्रमाणे. त्याच्यामुळे हा ठराव प्रचंड बहुमताने व्हायला पाहिजे. ह्या ठरावाला विरोध व्हायचे काहीच कारण नव्हते.

**अनंत पाटील :-**

तुम्ही मिरा भाईंदर नगरपालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज नामकरण करा.

**जयंत पाटील :-**

आता दिलेल्या ठरावाचे काय? तुमचा त्या नावाला विरोध आहे का?

**अनंत पाटील :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेला नाव द्या छत्रपती शिवाजी महाराज महानगरपालिका म्हणून.

**रतन पाटील :-**

मी विरोध केलाच नाही.

**जयंत पाटील :-**

आनंदाची गोष्ट आहे.

**अनंत पाटील :-**

याचा अर्थ छत्रपती शिवाजी महाराज नाव द्यायला तुमच्या मनात पाप आहे.

**जयंत पाटील :-**

यात पाप आणि पुण्याचा प्रश्न येत नाही.

**अनंत पाटील :-**

कपटाने विषय आणलेला आहे. या कपटी विषयामध्ये आम्ही शिवसेनेतील लोकांना भाग घ्यावा लागला आहे. आतापर्यंत सभागृहाचे कामकाज नीटनेटके चालले होते. परंतु शहरातील वातावरण तंगविण्यासाठी सत्तारुढ पक्ष आहात.

**जयंत पाटील :-**

या ठरावामध्ये अशी दुरुस्ती करावी अशी मी विनंती करतो की, भाईंदर (प.) स्टेशनापासून काशिमिरा नाक्यापर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव द्यावे अशी मी दुरुस्ती मांडतो. येता जाता आम्हांला अभिमानाने वाटले आम्हांला प्रेरणादायी होईल.

**अनंत पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नामकरण करायचे, छत्रपती शिवाजी महाराज मिरा भाईंदर महानगरपालिका.

**रोहित सुवर्णा :-**

तो अधिकार शासनाला आहे.

**मोहन पाटील :-**

माझा मुलगा आहे त्याचे नाव ठेवायचे असेल तर कोणाला दुसऱ्याला बोलावू का? जे मिरा भाईंदरचे नाव दिले ते राज्य शासनाने दिले त्याचा जी.आर. झालेला आहे.

**अनंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील तुम्हाला विरोध केला नाही. परंतु उशीरा सुचलेली बुद्धी आहे. तुम्ही फार लवकर जागे झालात. कुठेतरी पोळी भाजायची, म्हणून हा विषय आलेला आहे. जैन मार्गाचा विषय असताना तुम्ही छत्रपती शिवाजी महाराजांना याच्यात गोवले कसे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांचे मत ठरावाच्या बाजुने आहे का विरोधात आहे याचा स्पष्टपणे खुलासा ह्यांनी करावा.

**अनंत पाटील :-**

छत्रपती शिवाजींच्या नामकरणाला विरोध नाही.

**मा. महापौर :-**

ठरावाच्या बाजूला आहे.

**अनंत पाटील :-**

तुम्ही सन्मान केला. आम्ही त्याचा आदर करु

**मा. महापौर :-**

ह्या ठरावाच्या बाजूला आहात की विरोधात आहात.

**अनंत पाटील :-**

तुम्ही कुठला विषय कुठेतरी आणता? हा विषय चुकीच्या मार्गाने आणला, असे आम्हाला म्हणायला लागेल.

**आसिफ शेख :-**

मा. पीठासन अधिकारीसाहेब या ठिकाणी महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव या ठिकाणी सत्ताधारी पक्षाने दिलेले आहे. खरे म्हणजे शिवसेनेच्या सर्व सदस्यांना मनापासून थोडिफार लाज वाटली पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

लाज बोलायचे नाही. लाज वाटणार नाही तर अभिमान वाटेल. सन्मा. सदस्य आसिफ शेख लाज हा शब्द तुम्ही मागे घ्या.

**(सभागृहात गोधळ)**

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील हे सरपंच होते, सदस्य होते, आताही सदस्य आहेत. त्यांना शिवसेनेची भूमिका कळली नाही. याशिवाय काय दुसरे म्हणायला पाहिजे. आपण या ठिकाणी खरे

म्हणजे सतारुढ पक्षाचे अभिनंदन करायला पाहिजे होते. पण आपले प्रयत्न आहेत की, आपण या ठिकाणी गुंजाव केला. आपण सरळ सांगायला पाहिजे की, सत्ताधारी पक्षाने ठराव मांडला. छत्रपतींचा या ठिकाणी उदो उदो करतो. आमचा पाठिंबा आहे. तुम्हाला कळत नाही, तुम्ही बुचकाळयात पडलेले आहात. तटस्थ भूमिका घेतात म्हणजे काय? तुम्ही समर्थन द्यायला पाहिजे होते. छत्रपतींच्या नावाने तुम्ही विरोध करता. तुम्ही सांगा छत्रपतींच्या नावाला आमचा विरोध आहे.

**रतन पाटील :-**

काय भूमिका घ्यायची ती भूमिका आम्ही घेऊ.

**आसिफ शेख :-**

तुम्ही तुमची भूमिका क्लिअर करा. छत्रपतींच्या नावाला विरोध आहे, असे सांगा. आमची मेजॉरिटी आहे. आम्ही पास केला आहे.

**रतन पाटील :-**

विरोध कशाला?

**आसिफ शेख :-**

उठ मराठा उठ म्हणणारे झोपले का? छत्रपतीं बद्दल आपल्याला आदर आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत आपण म्हणतो. आपले प्रेम गेले कुठे? आपले प्रेम बेरकी आहे का? आपण स्पष्ट करा आपले छत्रपतींबद्दल केवढे प्रेम आहे, ते दिसून येते. या ठिकाणी जो सत्ताधारी पक्षाने ठराव मांडलेला आहे, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी ठराव मांडला आणि सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी त्याला अनुमोदन दिलेले आहे. या ठिकाणी चांगला मॅसेज सत्ताधारी पक्षाने संपूर्ण महाराष्ट्राला दिला आहे. छत्रपतींबद्दल आमच्या भावना तीव्र झालेल्या आहेत आणि त्या तीव्र भावनेमुळे आमच्या तोंडून निघालेला हा शब्द मागे घेतो. आमच रक्त उफाळलेले आहे. त्यांचे रक्त गोठलेले आहे. त्यामुळे भावनेच्या भरात चुकुन एखादा शब्द निघाला असेल. त्याबददल शब्द मागे घ्यावा. परंतु माझे एवढेच म्हणणे होते की, छत्रपतींचे नाव येते, महाराजांचे नाव येते, ज्या महाराजांनी सर्व धर्म, सर्व समाजातील लोकांना बरोबर घेऊन राज्यकारभार केला आणि त्यांच्या नावाला विरोध. छत्रपती शिवाजी महाराज की जय.

**अनंत पाटील :-**

आमचा त्याला विरोध नाही.

**शुभांगी नाईक :-**

शब्द तो मागे घ्या आणि तुम्ही माफी मागा.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आपण दिलगीरी व्यक्त केल्याबददल धन्यवाद देतो. पण अशा शब्दांची माघार घेतली, खरोखर धन्यवाद देतो. अशा प्रकारे नाईक मॅडमनी असे बोललेले आहे की, तुम्ही शिवाजी महाराजांची जी विटंबना करता हे शब्द त्यांनी मागे घ्यावेत.

**शुभांगी नाईक :-**

साहेब विटंबना करु नका असे मी म्हणाले. विटंबना करा असे मी म्हणाले नाही. करु नका हा शब्द वापरला गेला आहे मी. करा हा शब्द बोलले नाही. मी तसे बोलणार पण नाही. कारण महाराजांबददल आम्हाला खूप अभिमान आहे.

**रतन पाटील :-**

आपल्याकडून आम्हाला इतिहास शिकण्याची गरज नाही.

**चंद्रकांत वैती :-**

मी पीठासन अधिकारी आणि कमिशनर साहेब, सन्मा. सभागृह सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी एक उपसुचना मांडली या उपसुचनेच्या माध्यमातुन भाईंदर पश्चिमेचा जो रस्ता आहे, पोलीस स्टेशनपासून ते स्टेशनपर्यंत महापालिके समोरचा, याला शिवाजी महाराज पथ असे म्हटले जाते. तर त्याची अशी उपसुचना आहे की, जो रस्ता फाटकाकडून थेट काशिमिरा पर्यंत संपूर्ण रस्त्याचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे व्हावी अशी उपसुचना होती. त्याचा गांभिर्याने विचार केला गेला पाहिजे आता सदस्यांमध्ये जे गैरसमज होते. कोणाच्याही तोंडातून कुठल्याही प्रकारची अवाजवी किंवा असंसदीय भाषा बाहेर पडली असेल, तर ते शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावेत. या शहराचा इतिहास पाहिल्यानंतर प्रत्येकालाच या महाराष्ट्रातून नव्हे तर संपूर्ण भारतवर्षामध्ये राहणाऱ्या प्रत्येक माणसाला छत्रपती शिवाजी महाराज या युग पुरुषाबद्दल सार्थ स्वाभिमान आहे आणि तो असावा. या शहराशी देखील शिवाजी महाराजांचे नाते होते. या शहरामध्ये पोर्तुगीजांशी सोळा हजार फौजेनीशी

घोडबंदरच्या या गढीवरती पोर्तुगीजांशी सामना शिवाजी महाराजांच्या फौजेने आणि मोरोपंत निंबाळकरांनी केला होता. चिमाजी आप्पा जेंव्हा वज्रेश्वरीच्या दर्शनाला जात होते, तेंव्हा घोडबंदरच्या किल्यामध्ये वास्तव्य करुन नंतर पुढे जायचे. इंग्रजदेखील या परिसरात वास्तव्य करुन राहिले होते. या सर्वांशी सामना करण्याची क्षमता छत्रपती महाराजांमध्ये होती. कदाचित हेच गुण या शहराला कामी आले असतील की, स्वातंत्र्य संग्रामामध्ये शंभराहून अधिक स्वातंत्र्यसैनिक या मिरा भाईंदरने दिले. शिवाजी महाराजांचे नाव आल्यानंतर प्रत्येकाला एक स्फुरण येते एक शक्ती येते मात्र थोड्याशा गैरसमजामुळे सदस्यांनी अवाजवी वक्तव्य केल्यामुळे थोडेसे वातावरण गंभीर झाले होते. मात्र सर्वानुमते या ठरावाला मान्यता मिळाली आहे की, या मिरा भाईंदरच्या प्रमुख रस्त्याचे नामकरण छत्रपती शिवाजी महाराज मार्ग व्हावे. जेंव्हा मिरा ग्रामपंचायतचे सरपंच यशवंत भोईर होते, तेंव्हापासून त्यांची मागणी होती. एक टर्म ते नगरपालिकेचे नगरसेवक होते. त्यानंतर दोन टर्म त्यांच्या पत्नी या तेथून नगरसेविका आहेत आणि त्यांनी देखील मागणी केलेली आहे. कारण या काशिमिरा नाक्यावर आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविलेला आहे आणि ते जे नाव दिले ते खरोखर सार्थ नाव ठरले. त्यामुळे पुन्हा मी सांगतो की, जे गैरवाजवी शब्द वापरले गेले ते आपण त्या कामकाजातून काढावेत आणि या विषयाला सर्वांची मान्यता मिळालेली आहे असे आपण मान्य करु या.

**धनराज अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब आता या ठिकाणी चांगला उहापोह झाला. मी तुम्हाला एकच विचारतो, हा जो आपण प्रस्ताव आणलेला आहे, तो प्रस्ताव आपण आणु शकतो का? नियमामध्ये आहे का? हे पहिले मला सांगा. प्रस्ताव चुकीचा आणलेला आहे. प्रस्ताव आपण आणु शकत नाही हे नियमात नाही. आपण बघा.

**मा. आयुक्त :-**

हा प्रस्ताव प्रकरण २ ज प्रमाणे आणता येतो आणि तसा रितसर प्रस्ताव या ठिकाणी प्राप्त झालेला आहे.

**प्रकाश दुबोले:-**

आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर देण्यापूर्वी या विषयाला त्यांचा विरोध होता. म्हणून ते बहिष्कार करुन बाहेर गेले. परत या विषयावर ते चर्चा कसे काय करु शकतात.

**संजय पांगे :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले तुम्हाला सभाशास्त्र समजते का? सभाशास्त्र आधी वाचून या.

**प्रकाश दुबोले :-**

सभाशास्त्र वाचून यायला तुम्ही चर्चा सोडून का गेले? चर्चा सोडून गेले ,बहिष्कार म्हणून पुन्हा त्या विषयाला का आले?

**संजय पांगे :-**

तुम्ही आम्हाला सभाशास्त्र शिकवू नका.

**प्रकाश दुबोले :-**

तुम्ही पण आम्हाला सभाशास्त्र शिकवू नका. तुमच्या पेक्षा तरी मी ज्येष्ठ आहे.

**संजय पांगे :-**

मी पुन्हा इथे येऊ शकतो.

**प्रकाश दुबोले :-**

येऊ शकता तर पुन्हा त्या विषयावर चर्चा करु नका.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले तुम्ही आमच्या मताने जेष्ठ बनलात.

**प्रकाश दुबोले :-**

कोणाच्या मताने बनले हा वाद नाही. तुम्हाला मत दिले होते हे तुमचे दुर्देव. तुम्ही नगराध्यक्ष झाले नाहीत. तुम्हालाही आम्ही मते दिली होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त एक असा प्रश्न आहे, स्थायी समितीमध्ये कुठलाही प्रस्ताव आणताना चार सभासदांची किमान संख्या पाहिजे. या महासभेमध्ये असा प्रस्ताव आणायला अशी किमान किंवा कमाल संख्या त्या नियमामध्ये आहे का? असेल तर ती किती आहे ह्याचे जरा उत्तर दयावे.

**मा. आयुक्त :-**

मला वाटते या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. आपल्याकडे जर पुस्तक असेल तर आपण कृपा करुन वाचून ते पहावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब जर आम्ही वाचले असते, तर तुम्हाला या पीठासीनच्या पदावर बसवले नसते.

**मा. आयुक्त :-**

मग मी उत्तर दिलेले आहे. त्या उत्तरावर विश्वास ठेवा.

**मोहन पाटील :-**

त्यांना महाराष्ट्र शासनाने इथे पाठवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाचा म्हणून शब्द तुम्ही मागे घ्या. एखादया सन्मा. नगरसेवकाला तुम्ही असे बोलता, ते तुम्हाला असे शोभत नाही.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आता जे बोलेले ते शब्द त्यांनी मागे घ्यावेत. आयुक्तांबद्दल असे अपशब्द काढायला नाही पाहिजे होते. तुम्हांला खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही असे बोलले. त्यांनी हे शब्द मागे घ्यावेत.

**मा. आयुक्त :-**

मला या ठिकाणी शासनाने बसवले आहे. तुम्ही बसवले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा सन्मा. नगरसेवकांचा अपमान आहे. पुस्तकामध्ये कलम आहे ते तुम्ही वाचून दाखवा.

**मोहन पाटील :-**

डायसवर बसलेली व्यक्ति जेष्ठ असते. डायसवर बसलेल्या व्यक्ती कोण आहेत याचे भान आम्ही सदस्यांनी ठेवायला पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे तुम्हाला शोभत नाही, वाचून या म्हणून सांगण्याचे.

**मा. आयुक्त :-**

याच्यामध्ये शोभण्याचा काय प्रश्न येतो. वाचून घ्या म्हणजे खात्री करुन घ्या, अशा अर्थाने मी बोललो. तुम्हाला जर खात्री नसेल तर वाचून खात्री करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही वाचून दाखवा तुमच्याकडे पुस्तक आहे आमच्याकडे नाही आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्यांनी मा. आयुक्त साहेबांचा असा अपमान केलेला आहे. असा अपमान करु नये. खरे म्हणजे आपल्याला या ठिकाणी लोकांनी निवडून पाठविलेले आहे. आयुक्त साहेब परीक्षा पास होऊन या ठिकाणी आलेले आहेत. या पध्दतीने असा अपमान होता कामा नये. हे शब्द आपण मागे घ्या.

**मा. आयुक्त :-**

प्रकरण २, महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज, याच्यामध्ये कलम जे आहे. कोणत्याही सभेत कलम ४४ खालील कोणत्याही प्रश्नाखेरीज कोणतेही कामकाज पुढे आणण्याची किवा अशा सभेच्या नोटिशीत पुर्वी विनिर्दिष्ट करण्यात आला असेल असा कोणताही मुळ प्रस्ताव मांडण्याची ज्या कोणत्याही पालिका सदस्याची इच्छा असेल, अशा पालिका सदस्यांनी त्या सभेसाठी ठरविण्यात आलेल्या दिवसाच्या निदान तीन पूर्ण दिवस अगोदर नगरपालिका सचिवास त्यासंबंधी लेखी नोटिस दिली पाहिजे आणि ज्या कामकाजाची किंवा प्रस्तावाची अशा प्रकारे नोटीस दिली असेल. त्या प्रस्तावाची किंवा कामकाजाची पूर्व घोषणा उक्त सचिवांनी आदल्या दिवशीच्या आत स्थानिक वृत्तपत्रात दिली पाहीजे. या सर्व औपचारिक बाबी या प्रस्तावाच्या बाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार हा प्रस्ताव या सभागृहापुढे आलेला आहे.

**लिओ कोलासो :-**

आपण किती भावना विवश आहोत आणि आपण आपण काय करतो आणि किती वेळात विसरून जातो खरतर मी आपल्या सर्वांना सांगतो की, जेंव्हा ह्या आयुक्तांनी एक वर्षाचा कार्यकाल यशस्वीरित्या पूर्ण केला त्याच्याबद्दल एवढी उत्सुकता लागली की, ठराव मी आणु की अनुमोदन मी देऊ

की मी भाषण करू एवढी घाई चालली होती. खरंतरं सभागृह नेत्याने पहिले बोलायला पाहिजे. पण ठीक आहे. मी समजू शकतो आपली एवढी घाई आहे, एवढा उत्साह आहे. त्यामुळे आपण बोललात. पण सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण आता आयुक्त साहेबांना एवढया चांगल्या शुभेच्छा दिल्या आणि लगेच त्यांच्या आसनाला तुम्ही सुरुंग लावण्याच्या गोष्टी करता हे काही बरोबर नाही. आपण खरे, थोडे तारतम्य बाळगून सभागृहाचे कामकाज करावे अशी मी आपणा सर्वाना विनंती करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, माझी आपल्याला आणि संपूर्ण सभागृहाला विनंती आहे सगळ्यांना कल्पना आहे. विषय कसा आला, कोणत्या नियमाखाली आला आणि कसे कसे काय काय घडलेले आहे. कृपया सभागृहाचा आणि सर्वांचा वेळ वाया न घालवता आपण सभागृहाच्या बाहेर गेले असताना सभागृहामध्ये एक मताने हा ठराव पारित झालेला आहे. आपल्याला या ठरावाच्या बाजूला बोलायचे आहे का विरोधात बोलायचे आहे, तेवढे बोलून मग आपण सुरुवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

मला ठरावाच्या विरोधात बोलायचे आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आणि त्यांचे मंत्रिमंडळ जे मघाशी बाहेर गेले त्याच्या अगोदर विषय होता की, त्यांनी सभागृहामध्ये जे सन्मा. सदस्य शशिकांत शाह यांच्याबद्दल अपशब्द वापरले, त्यांची उंचीदेखील त्यांनी मोजली. पण त्यांना हे माहित नाही की, कुठल्याही व्यक्तिच्या उंचीने त्याचे कतृत्व मोजता येत नाही. लालबहादुर शास्त्रीची देखील उंची कमी होती. त्यांची उंची सांगण्याचा त्यांचा असा हेतु होता की, त्यांना चिडवायचे होते आणि ते काय खातात, काय पितात, कदाचित सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्याकडे त्याची यादी देखील असेल. सभागृहाला त्यानी दिलेली नाही. तर ते शब्द त्यांनी मागे घ्यायला पाहिजेत.

**मा. महापौर :-**

त्या संदर्भामध्ये मी त्यांना रुलिंग दिले होते आणि त्याना भाषण थांबवायला सांगितले होते. माझ्या रुलिंगच्या विरोधात ते बाहेर गेले होते आणि म्हणून सभागृहाच्या कामकाजातून ते शब्द काढून टाकण्यांत यावे.

**रोहिदास पाटील :-**

मी पीठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने विचारतो आहे, या अशा ठरावावर जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की, एक सदस्य तो ठराव आणू शकतो. तर प्रशासकीय आयुक्त म्हणून आपली टिपणी काय आहे? याला आपण काही टिपणी जोडली आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

हा विषय प्रशासनाचा नाही. प्रशासनाने आणलेला विषय नाही. विषय महासभेपुढे येण्याचा हा एकच मार्ग नाही आहे. प्रशासन जे विषय देतात. ते विषय आणि हा विषय ज्या पध्दतीने आलेला आहे हा एक दुसरा मार्ग आहे आणि महापौरांचे अधिकार आहेत, कुठले विषय या सभेपुढे आणायचे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब मी तुमच्या कामकाजाची अत्यंत चिंता व्यक्त करतो. आपण इतके सक्षम असूनसुध्दा इतकी बघ्याची भूमिका घेता हे दुर्दैव. तुम्ही ज्या पध्दतीने हा विषय हाताळता.

**मा. आयुक्त :-**

मी हाताळण्याचा प्रश्न येतच नाही. हा विषय प्रशासनाचा नाही. हे मी ठामपणे सांगितले आहे. हा विषय या सन्मा. सभागृहाचा आहे आणि ज्या सन्मा. सदस्यांनी हा विषय आणलेला आहे. त्याच्यावर चर्चा करुन निर्णय घेण्याचा आहे. याच्यामध्ये प्रशासनाची भूमिका कुठल्याही प्रकारची असू शकत नाही. आम्हाला निष्कारण ओढण्याचा यामध्ये कृपा करून करू नका.

**रोहिदास पाटील :-**

आता तुम्ही येणारच. या शहराचे कायदा सुव्यवस्था, या शहराचे हित सांभाळण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे.

**मा. आयुक्त :-**

कायदा सुव्यवस्था पोलिस बघतात. महानगरपालिका आयुक्तांचा तो विषय नाही.

**रोहिदास पाटील :-**

आहे बघा तुम्ही एकच उत्तर द्याल. तर तेही रेकॉर्डला जाईल की, आयुक्तांचा कायदा सुव्यवस्था सांभाळण्याचे कर्तव्यच नाही. असे असेल तर ते रेकॉर्डला येउ दे. आम्हाला त्यामध्ये

काहीही फरक पडणार नाही. पोलिसांचे कायदा सुव्यवस्था बघण्याचे काम आहे. त्यापूर्वी पहिले कर्तव्य हे आयुक्तांचे आहे, असे आमचे मत आहे आणि ज्या पध्दतीने बहुमताने विषय येत असतील तर डॉ. हेडगेवारांचे काय? छत्रपती शिवाजी महाराजांचे काय? किंवा अन्य काय असतील या शहराची कायदा सुव्यवस्था बिघडल्याशिवाय राहणार नाही डॉ हेडगेवारांचे मा. उपआयुक्त केळकर साहेब यांनी आम्हाला बोलू दिले नाही. आता बोलायला परवानगी दिली त्याची भूमिका तुम्हालाच मांडायला लागेल की, डॉ हेडगेवारांचे कर्तव्य काय होते? त्यांचा या शहराशी काय संबंध होता. सभागृहातील आवाज बंद केला म्हणजे सभागृहातील आवाज बंद होत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील या सभागृहामध्ये तुमचा आवाज कोणी बंद केलेला नाही. आपण सभागृहाच्या मान अपमान मर्यादा सोडून भाषण करता. म्हणून आपल्याला थांबविण्यात आले होते. अन्यथा मी सत्ताधारी नगरसेवकांना बसायला सांगितले आणि आपल्याला भाषण करण्याची संधी दिली. पण आपण सभागृहाचा सर्व मान सोडून व्यक्तिगत टिका करायला त्यावेळी सुरुवात केली म्हणून आपल्याला बसायला सांगितले होते. म्हणून कृपा करून भाषण करीत असताना आतासुध्दा आपल्याला जी संधी दिलेली आहे, जी मर्यादेमध्ये आहे आणि जी व्यवस्थित आहे, विषयाला धरुन आहे, ते बोलण्यासाठी तुम्हाला परवानगी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

विषयाशिवाय बोलण्याची आम्हाला हौसच नाही आहे. हा विषय जो मा. उपआयुक्त केळकर साहेबांनी मांडला की, सन्मानित सदस्यांचा पत्रकामध्ये डॉ. हेडगेवार मार्ग कोणीही जबरदस्तीने त्या निवेदनात आहे. एका राजकीय पक्षाने माझी अशी अपेक्षा होती की, जसे केळकर साहेबांनी उत्तर दिले तर त्याची असलेली नोंट सर्व सभासदांना ती दयायला पाहिजे होती की, वस्तुस्थिती काय आहे? सन्मा. सदस्यांनी त्यांच्यावर आरोप केलेला आहे की, एका राजकीय पक्षाने जबरदस्तीने बेकायदेशीर नामकरण केलेले आहे. नगरपालिकेचा जो प्रशासकीय ठराव आहे आणि डॉ. हेडगेवारचा या शहराशी संबंध काय? तर तो संबंधही दाखविणे कर्तव्य आहे, समजून घेणे ही कर्तव्य आहे. डॉ केशव बळीराम हेडगेवार हे संघाचे संस्थापक होते. त्यांचे अनेक देशभर नाही तर विदेशात अनेक शाखा निघाल्या. अनेक शाखांकडून अनेक समाज प्रबोधनाची कामे झाली. वेगवेगळया संस्था हजारोंच्या नाही तर कोटींच्या संख्येने ते काम करतात आणि या भारत देशाची आताची जी राजनिती चालली आहे, आताचे जे कतृत्व चाललेले आहे, देशामध्ये विदेशामध्ये जो मान मिळत चालला आहे, ते डॉ केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रेरणेतून ज्या संस्था निघाल्या, त्यामधून चालले आहे. आज डॉ केशव बळीराम हेडगेवार नाव दिले. तर ते नंतर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि त्याच्या अगोदरची केशवसृष्टी या जगाच्या इतिहासात दिसत आहे. त्याच्यामुळे या शहराचा मान वाढला.

**मोहन पाटील :-**

साहेब हा ठराव झालेला आहे. विरोधी मत तुम्ही घेता तर सभा संपली म्हणून आपण जाहिर करा. स्वातंत्र्य सैनिकांची नावे द्यायला पाहिजेत. संघाचे चालक मालक त्या त्या संस्थेचे आहेत, हा विषय वेगळा आहे. परंतु विषय संपला असेल, तर आपण राष्ट्रगीत घेऊन सभा संपवावी

**मा. महापौर :-**

विषय संपलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझे भाषण पूर्ण करा आणि विषय संपवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण विषय सोडून वेगळया विषयाकडे वळता.

**रोहिदास पाटील :-**

डॉ. केशव बळीराम हेडगेवार कोण आहेत. ते तुम्हाला ऐकण्याची गरज वाटत नाही का? त्याच्यामध्ये लिहिलेले आहे काय संबंध म्हणून तुम्ही तुमच्या हातात असलेले कागद वाचले की नाही वाचले.

**मा. महापौर :-**

हवे तर ठरावावर मतदान घ्या.

**मोहन पाटील :-**

मतदान झालेले आहे. ठराव मंजुर झालेला आहे. तटस्थ असलेल्या शिवप्रेमी लोकांनीसुध्दा, आपल्या सर्व सदस्यांनी त्याला संमती दर्शविली आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही चुकीचे रूलिंग देत आहात. हा ठराव सर्वानुमते झालेला नाही.

**आसिफ शेख :-**

ठराव मंजूर झालेला आहे आणि आपण आता त्या ठिकाणी नामकरणाचा सोहळा लवकरात लवकर आयोजीत करून तारीख निश्चित करून टाका आणि सर्वांना त्या कार्यक्रमाला बोलावून घ्या.

**प्रकरण क्र. ५४ :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत शहा यांचे दिनांक १३/१०/२००३ चे नामकरणाबाबतचे पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

**ठराव क्र. ४२ :-**

भाईंदर रेल्वे स्टेशन ते भाईंदर पोलिस स्टेशन व भाईंदर पोलिस स्टेशन ते काशिमिरा नाका शिवाजी पुतळ्यापर्यंतच्या रस्त्याला छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नांव द्यावे असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत शहा.** **अनुमोदन :- श्रीम. रिटा शहा.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

हा ठराव बहुमताने मंजुर झालेला आहे. सभा संपली असे मी जाहिर करतो. राष्ट्रगीतासाठी सर्वांनी उभे रहावे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०१.४० वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**